श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे
अधिकृत नियतकालिक

मार्च - एप्रिल २०१९
रुपये ८/-

# साईलीला

स्थापना १९२३


## रामनवमी विशेष



मन साईरामी रंगले । अवघे साईरूप झाले ।। सबाह्य अंतरी । साईरामरूप कोंदले ।।


## साईभक्त हेमाडपंतकृत श्री साईसच्चरितमधील

# श्री रामस्तुती



हीं दो अक्षरें उलटी स्मरला ।
तो कोळी वाटपाड्याही उद्धरला ।
वाल्याचा वाल्मीक होऊन गेला ।
वाक्सिद्धी पावला नवलाची ।। (१८२.१९)
मरा मरा उलटें म्हणतां ।
राम प्रकटला जिव्हेवरता ।
जन्माआधींच अवतारचरिता ।
जाहला लिहिता रामाचे ।। (१८३.१९)
रामनामें पतितपावन ।
रामनामें लाभ गहन ।...
रामनामाच्या आवर्तनें ।
उठेल जन्ममरणांचें धरणें ।
एका रामनामाचिया स्मरणें ।
कोटिगुणें हे लाभ ।। (१८५.१९)
जेथें रामनामाचें गर्जन ।
फिरे तेथें विष्णूचें सुदर्शन ।
करी कोटी विघ्नांचें निर्दळण ।
दीनसंरक्षण नाम हें ।। (१८६.१९)

साईभक्त हेमाडपंत



## साईंच्या मुखीचे रामभजन

गुरुकृपांजन पायो मेरे भाई । रामबिना कछु मानत नाहीं ।।
अंदर रामा बाहर रामा । सपने में देखत सीतारामा ।।
जागत रामा, सोवत रामा । जहां देखे वहां पूरनकामा ।।




स्थापित वर्ष १९२३ * नूतन नोंदणी वर्ष १९, अंक २


# साईलीला


मार्च-एप्रिल २०१९ • रामनवमी विशेष




* संपादक
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी


कार्यकारी संपादक *
विद्याधर मा. ताठे
एम.ए.(मराठी), बी. जर्नालिझम




## अंतरंग...




- संस्थानचे अध्यक्ष यांचे मनोगत — ५
- संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मनोगत — ६
- संपादकीय : विद्याधर ताठे — ७
- जागतिक सांस्कृतिक सोहळा : कुंभमेळा — ९
- संतकवी श्रीधर यांचा रामविजय : विद्यानंद — १२
- साईचरित्रामधून घडणारे साई'राम'दर्शन : सौ. गौरी काटे — १५
- समर्थांची रामोपासना : प्रा. पंढरीनाथ पाटील — १९
- सुगम साईमाहात्म्य : सौ. शैलजा रा. रोहोम — २७
- शिर्डी वृत्त — ३०

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

### व्यवस्थापन समिती



डॉ. सुरेश काशिनाथ हावरे
(अध्यक्ष)




ॲड. मोहन मोतीराम जयकर
(सदस्य)



डॉ. राजेंद्र राजाबली सिंग
(सदस्य)




श्री. भाऊसाहेब राजाराम वाक्चौरे
(सदस्य)



श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे
(सदस्य)



सौ. योगिताताई शेळके
(पदसिद्ध सदस्य)



श्री. दीपक मधुकर मुगळीकर, भा.प्र.से.
(सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी)

**इंटरनेट आवृत्ती : URL : http://www.shrisaibabasansthan.org**


**● टपालखर्चासहित वार्षिक वर्गणी : रु. ५०/- ● आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/- ● परदेशाकरिता वार्षिक वर्गणी : रु. १०००/-**

**● कार्यालय ●**

'साईनिकेतन', ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. दूरध्वनी : (०२२)२४१६६५५६,
फॅक्स : (०२२)२४१५०७९८, ई-मेल : saidadar@sai.org.in
✻ शिर्डी कार्यालय : मु. पो. शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर. दूरध्वनी : (०२४२३)२५८५००
फॅक्स : (०२४२३)२५८७७० ई-मेल : 1. saibaba@shrisaibabasansthan.org 2. saibaba@sai.org.in

- आवरण व अन्य पृष्ठे सजावट : समीर गोरे (पुणे), सिध्दीविनायक ग्राफिक्स (पुणे) फोन : ९३७०१४२६७६
- संगणकीय अक्षर जुळणी : ओके क्रिएशन, पुणे ● मुद्रित शोधन : सौ. अपर्णा जोशी
- मुद्रण स्थळ : मधुरा प्रिंट सोल्युशन्स्, बी-२४, अंबड एम.आय.डी.सी., नाशिक - १०. मो. ७८८७८९७६७८
- प्रकाशक व मुद्रक मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता हे द्वैमासिक मधुरा प्रिंट सोल्युशन्स्, बी-२४, अंबड एम.आय.डी.सी., नाशिक - १० येथे छापून 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०१४ येथे प्रकाशित केले.
- नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते त्या लेखकांची स्वतंत्र मते असून, त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.
- सर्व प्रकारच्या हरकती, वादविवाद, मतभेद, हक्क, कायदेशीर कार्यवाही आदी बाबी मुंबई परिक्षेत्रातच उपस्थित करता येतील.

# साईसेवेचा महिमा अगाध!



साईबाबांचा प्रभाव जगभर जाणवतो. एकट्या अमेरिकेत ८० साईमंदिरे आहेत. इंग्लंडमध्ये ५, जर्मनीत ५, जपान, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड आदी देशांत साईमंदिरे आहेत. मलेशियात २२ साईमंदिरे आहेत. जगातील ४७ देशांमध्ये जवळपास ४५० साईबाबांची मंदिरे आहेत... आणि भारतात आहेत जवळपास ८ हजार साईमंदिरे. एवढा पसारा, व्याप्ती, मला नाही वाटत, कुठल्याही आधुनिक संताची असेल.

बरे, ही साईमंदिरे, त्या त्या ठिकाणी भक्तांनीच निर्माण केलेली आहेत. शिर्डीहून कुणी साईप्रचारक निघाले व जगभर प्रवास करून त्यांनी अनेकांना प्रभावीत केले व त्यानंतर ही मंदिरे निर्माण झाली, असे काही झाले नाही. मग प्रश्न असा पडतो की, या साईमहिमेचा प्रचारक कोण? सूत्रधार कोण? वाहक कोण? बराच विचार केल्यावर असे लक्षात येते की, या साईविचारांचा प्रचारक दुसरा-तिसरा कोणी नसून, खुद्द साईबाबाच आहेत. याशिवाय दुसरे कोणतेही विधान करण्याला सबळ आधारच नाही. असे जर असेल, तर मग, ''नित्य मी जिवंत, जाणा हेंचि सत्य। नित्य घ्या प्रचीत अनुभवें।'' या विधानाला खरेपणा प्राप्त होतो. बाबांनीच अनेकांना साक्षात्कार दिला, अनुभूती दिली, अनुभव दिला, दृष्टांत दिला आणि त्या भक्ताने भक्तीपोटी बाबांचे मंदिर उभारले.

हा चमत्कार नव्हे! हे आहे श्रद्धेचे बळ. म्हणून, बाबांच्या श्रद्धा व सबुरी या शिकवणीला गहन अर्थ आहे. ''**Faith can move mountains**'', असे म्हटले जाते. श्रद्धेची ताकद अफाट आहे. त्यासोबतच सबुरीला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. आज-काल लोकांना सर्व कसं इन्स्टंट पाहिजे. थांबायला वेळ नाही. आत्ताच्या आता पाहिजे. असे म्हणतात, ''**mas ers eve ything, The man w o maste s patience**''. म्हणून सबुरीला महत्त्व आहे. अशी ही बाबांची शिकवण त्रिकालाबाधित सत्य आहे. म्हणून, साईंचा महिमा अगाध आहे. साईलीला सर्वदूर परिचित आहेत; पण साईसेवेवर जरा पडदा पडलेला दिसतो. बाबांनी भिक्षा मागून, स्वत: दळून-शिजवून लोकांना जेवू घातले. रुग्णांची सेवा-शुश्रूषा केली, गोसेवा केली, झाडे लावली, निसर्ग जपला, आणि म्हणून हाच आदर्श डोळ्यांसमोर ठेवून साईबाबा संस्थान शिर्डीद्वारे मोठ्या प्रमाणावर सेवा दिली जाते. मग यात भले मोठे ग्रीन किचन असलेले प्रसादालय येते, ५५० बेडची दोन हॉस्पिटल्स येतात, शाळा-कॉलेजांचे शैक्षणिक जाळे येते, हजारोंच्या निवासाची सोय येते, व ती सेवा अविरत ३६५ दिवस सुरू असते. अनेकांना शिर्डीत हाच अनुभव येतो की, 'साईसेवेचा महिमा खरोखरच अगाध आहे!'

सर्व साईभक्तांना शुभेच्छा!

डॉ. सुरेश हावरे,
अध्यक्ष,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# शिर्डी साई संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भूमिका यजमानाची!

सस्नेह नमस्कार! ॐ साईराम!!...



श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या विश्वविख्यात न्यासाचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून सोमवार, दिनांक २५ मार्च २०१९ रोजी महाराष्ट्र शासनाने माझी नियुक्ती केली आणि त्यानंतर गुरुवार, दिनांक २८ मार्च २०१९ रोजी मी प्रत्यक्ष कार्यभार स्वीकारला.

या नियुक्तीमुळे मी अत्यंत आनंदित झालो आहे. ज्या देवस्थानात आपल्या देशातीलच नव्हे, तर जगाच्या कानाकोपऱ्यातून भाविक येतात आणि नतमस्तक होतात, अशा देवस्थानाचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून माझी नियुक्ती व्हावी, हा माझ्यासाठी फार मोठा परमोच्च योग तर आहेच, याचबरोबर ही श्री साईबाबांची कृपा आहे, असं मी समजतो.

शासनातलं प्रशासन आणि देवस्थानातलं प्रशासन, त्यातही शिर्डीसारख्या विविध आयाम असलेल्या वैश्विक तीर्थस्थळातलं प्रशासन यात फार मोठा फरक आहे. शासनातल्या प्रशासनाचा एक ठराविक साचा आहे, चौकट आहे. इथेही नियमांची चौकट आहेच, पण या चौकटीला आणखी एक अदृश्य बाजू आहे, ती म्हणजे इथे येणाऱ्या भाविकांच्या श्रद्धेची. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की या देवस्थानाचं व्यक्तिमत्त्व बहुमुखी आहे. इथं सर्व जाती–धर्म–पंथांतील माणसं विविध भौगोलिक प्रदेशांतून येतात. सर्वांनाच बाबा आपले वाटतात. ही सर्व माणसं श्रद्धाभाव मनात ठेवून येतात. अनेक दृश्य–अदृश्य अपेक्षा बरोबर घेऊन ते इथं येतात. यातला आणखी एक भाग असा की, अगदी सामान्य आर्थिक परिस्थितीतील माणसं जशी इथं येतात, तशी आर्थिकदृष्ट्या संपन्न असणारी, मोठे उद्योगपती, राजकारणी, सरकारी अधिकारी, कलाकार, अशी विविध आर्थिक, सामाजिक, कला, क्रीडा क्षेत्रांतील माणसंही साईदरबारात हजेरी लावायला येतात. अर्थात्, बाबांना सगळे सारखे... त्यांच्यासाठी सगळेच व्ही.आय.पी.... परंतु, येणाऱ्या या सर्व भक्तांच्या श्रद्धेला, त्यांच्या भावनेला, त्यांच्या लौकिक परिस्थितीला आणि अधिकाराला विनाकारण धक्का लागू नये, ठेच पोहोचू नये, याचं भान मात्र इथं काम करताना ठेवलं पाहिजे, असं मला वाटतं. घरी येणाऱ्या पाहुणेमंडळींच्या सोयीसुविधेत काही कसूर राहिली नाही ना, हे जसं घरचा यजमान पाहतो, तशी यजमानाची भूमिका कार्यकारी अधिकाऱ्यांना पार पाडावी लागते. देवस्थानात श्रद्धाभाव व भक्ती मनामध्ये बाळगून भाविक येतात. त्यांच्या अंत:करणात भक्तीचा उदय करण्यासाठी साईबाबा प्रत्यक्ष या ठिकाणी आहेत. येणाऱ्या या भक्तांची उत्तम सोय करण्याचं काम इथल्या प्रशासनाला करायचं आहे. तेच प्रधान उद्दिष्ट असलं पाहिजे.

साईभक्तांसाठी काम करताना, त्यांना खऱ्या अर्थानं सोयी–सुविधा पुरविणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी सोडवण्यावरही माझा भर असेल. कारण, इथले कर्मचारी हे माझे हात आहेत. ते अधिकाधिक मजबूत कसे होतील, हे पाहण्याचाही माझा प्रयत्न असेल. शेवटी, कर्मचारीच साईभक्तांपर्यंत पोहोचणारा घटक आहे. तो आनंदी आणि समाधानी असेल, तरच हा साईरथ व्यवस्थित चालेल.

शेवटी, सर्व साईभक्तांकडून, सहकारी, अधिकारी आणि सर्व कर्मचाऱ्यांकडून सहकार्याची अपेक्षा ठेवून माझ्या मनोगताला विराम देतो.

पुनश्च ॐ साईराम!!...

दीपक मुगळीकर (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी




# संपादकीय

**विद्याधर ताठे - कार्यकारी संपादक**


**मन साईरामी रंगले । अवघे साईरूप झाले ।।**
**सबाह्य अंतरी । साईरामरूप कोंदले ।।**

**सर्व साईभक्तांना नवीन शके १९४१ विकारीनाम संवत्सराच्या, नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !** चैत्र महिना आला की वसंतऋतूच्या आगमनाबरोबरच उत्सवाची चाहूल लागते व मन रामभक्तीने भारावून जाते. सारा परिसर रामनामाच्या जयघोषाने-गाण्याने दुमदुमून जातो. श्री क्षेत्र शिर्डीमध्ये साईबाबांच्या मंदिरात दरवर्षी रामनवमीचा उत्सव थाटामाटाने व विविध कार्यक्रमांनी मोठ्या भक्तिभावाने संपन्न होतो. शिर्डीत हा रामनवमी उत्सव खुद्द साईबाबांनी साजरा करून घेतला व गेली १०८ वर्षे हा रामनवमी उत्सव अखंडपणे-अव्याहतपणे सुरू आहे. साईभक्त हेमाडपंत विरचित 'श्री साईसच्चरित' पोथीमधील ६व्या अध्यायात शिर्डीत रामनवमी उत्सव कसा सुरू झाला व पुढे कसा कसा साजरा होत गेला त्याची साद्यंत कथा आहे. साईभक्त वाचकांना ती परिचितच आहे. अनेक भक्त रामनवमीच्या पावन दिनी हा ६वा अध्याय मोठ्या भक्तिभावाने वाचन करतात.

श्री साईबाबांनी भक्तांच्या इच्छेनुसार त्या त्या भक्तांना त्यांच्या मनातील देवतेच्या रूपात - त्यांच्या गुरुरूपात दर्शन देऊन 'ईश्वर एक आहे', 'सबका मालिक एक' असा महाबोध घडविलेला आहे. काही भक्तांना त्यांनी रामरूपातही दर्शन दिले आहे. साईभक्त लक्ष्मीबाई खापर्डे यांना 'राजाराम'-'राजाराम' नामाचा जप करण्याचा उपदेश केलेला आहे. साईबाबांच्या या लीलांमधून परमार्थातील नाम व रूपभेदाचे उच्चाटन केले आहे. भक्तिक्षेत्रात श्रद्धा व निष्ठा या गोष्टी महत्त्वाच्या असतात. कोणताही देव अन्य कोणत्याही देवापेक्षा श्रेष्ठ-कनिष्ठ नसतो, तसेच सर्व संत, साधू हे अंतरंगाने एकच असतात. त्यांच्या नाम व रूपातील भेद, पंथ-संप्रदायातील भेद हे गौण आहेत. हा उदात्त, व्यापक विचार सर्व भक्तांनी समजून घेऊनच परमार्थ करावा, तरच तो सफल, सुफल होतो, सिद्धीस जातो. श्री साईबाबांच्या लीलांचा हाच अर्थ आहे, तो आपण समजून घेऊन साईभक्ती केली, तर बाबा संतुष्ट होतील. कोणाचाही द्वेष, निंदा, मत्सर यांना परमार्थात - भक्तिमार्गात स्थान नाही. सर्वांभूती समभाव, सर्वभूतांचे हित-कल्याण हेच खऱ्या भक्ताचे सद् लक्षण होय !



गेल्या वर्षीच्या रामनवमी विशेषांकात आपण रामभक्तीचा विश्वसंचार,




रामकथाकारांची परंपरा, समर्थांची व गोंदवलेकर महाराज यांची रामभक्ती, हिंदी प्रांतातील थोर संत गोस्वामी तुलसीदासांची रामभक्ती असे विविध विषय, शिर्डीतील रामजन्मोत्सव परंपरेसह पाहिले, वाचले. या वर्षीच्या अंकात महाराष्ट्रातील १७व्या शतकातील थोर संतकवी श्रीधर (नाझरेकर) यांच्या 'रामविजय' ग्रंथाचा परिचय दिलेला आहे. श्रीधरांची थोरवी अलीकडच्या पिढीतील अनेकांना माहीत नाही, म्हणून एका काहीशा दुर्लक्षित पण महाराष्ट्रातील खेडोपाडी, गावागावात सामूहिकरीत्या वाचल्या जाणाऱ्या, 'रामविजय'चा परिचय विशेष ठरेल असे वाटते. याशिवाय श्री साईसच्चरितातून घडणारे साई'राम'दर्शन हा विषय नेहमीप्रमाणे या अंकातही आहे. या वर्षी आपणास साईभक्त सौ. गौरी काटे यांच्या शब्दांत तो वाचावयास मिळणार आहे. भक्तांच्या मते दरवर्षी शिर्डीतील रामनवमी उत्सवात व अंकात तेच तेच असते. रामनवमी उत्सवातील कीर्तन व अन्य उपक्रमांना एक परंपरा आहे. कीर्तन व कीर्तनाचा रामजन्म हा विषय तोच असला, तरी कीर्तनकार नवा असतो. तसेच, साईलीला अंकात राम-साईराम हा विषय जुनाच असला, तरी नव्या दृष्टीने, नव्या शैलीत लिहिणारे लेखक नवे असतात. मुळात सनातन विषयातील नित्यनूतनत्व समजून घेण्यात आपली क्षमता कमी पडते. रामकथा ७ हजार वर्षे जुनी आहे व रामजन्मोत्सव गेली हजारो वर्षे भारतवर्षात ठिकठिकाणी दरवर्षी नव्या उत्साहाने, हर्षउल्हासाने साजरा होत आलेला आहे. वसंतऋतू दरवर्षी येतो व तन, मन प्रसन्न करून टाकतो, तसाच रामनवमी उत्सव नवचैतन्याचे दीप पेटवून मनमंदिराचा गाभारा भक्तीने-ज्ञानाने-आनंदाने उजळून टाकतो. माय-लेकराचे नाते जसे कधीच जुने, शिळे होत नाही, तद्वतच देव-भक्ताचे नाते हे कधीच कंटाळवाणे होत नाही; कारण ही नाती सनातन व नित्यनूतन असतात. देव-भक्ताच्या नात्यात - प्रेमात कंटाळवाणा तोचतोचपणा आला, तर भक्ताने आपले भावविश्व भक्तिविना शुष्क झाले आहे का, ते अंतरंगात डोकावून पहावे.

'हरि अनंत, हरिकथा अनंत' आहे, तसेच रामकथाही अनंत, अपार व नित्य आनंददायी आहे. रामकथा अशी दिव्य व आनंददायक नसती, तर रामकथेचा ना विश्वसंचार झाला असता, ना ती काश्मीर ते कन्याकुमारी विविध भाषांमध्ये गायली गेली नसती. भारतातील सर्व प्रमुख भाषांमध्ये व अनेक बोलीभाषांमध्येही रामकथा गायली गेलेली आहे. रामकथेच्या नित्यनूतनत्वाचा एक सुरेख दाखला म्हणजे महाराष्ट्र मयूर कवी मोरोपंत पराडकर यांनी १०८ प्रकारच्या वेगवेगळ्या रामकथा लिहिलेल्या आहेत. गदिमांच्या गीतरामायणाबद्दल बोलताना थोर कवी अटलबिहारी वाजपेयी म्हणाले होते - ''हे प्रभु राम! तुम्हारा चरित्र स्वयं एक काव्य है। अचरज की कोई बात ही नहीं, अगर कोई सुनकर कवी बन जाए।''

तर, अशा या नित्यनूतन रामकथेचा आस्वाद घ्या; प्रसन्न व्हा; आणि साईरामभक्तीच्या मार्गावर श्रद्धा-सबुरीने मार्गस्थ व्हा. जय साईराम !

- विद्याधर ताठे
कार्यकारी संपादक, साईलीला
भ्रमणध्वनी : ९८८१९०९७७५
E-mail : vidyadhartathe@gmail.com



# जगातील सर्वात मोठा सांस्कृतिक सोहळा

# कुंभमेळा

- प्रयागराज (उत्तर प्रदेश) त्रिवेणी संगमातटी
- सुमारे २४ कोटी भाविकांचा सहभाग

## युनेस्कोने जागतिक धरोहर – वारसा म्हणून या सोहळ्यास गौरविलेले आहे.

**उत्तर प्रदेशातील 'प्रयागराज' येथे गंगा-यमुना-सरस्वती नद्यांच्या संगमावर या वर्षी १५ जानेवारी ते ४ मार्च २०१९ असा ५५ दिवसांचा भव्य, दिव्य, विराट असा अर्ध कुंभमेळा संपन्न झाला. या कुंभमेळ्यात सुमारे २४ कोटी भाविकांनी जातपात, भाषा-प्रांत, पंथ-संप्रदायादि भेदाभेद विसरून भाग घेतला. कुंभमेळा हा जगातील सर्वोच्च असा सांस्कृतिक सोहळा असून, युनेस्कोने जागतिक धरोहर – वारसा म्हणून या सोहळ्यास गौरविलेले आहे. १७५ देशांच्या अध्यक्षांना या सोहळ्यासाठी यंदा उत्तर प्रदेश सरकारने निमंत्रण दिले होते. कुंभमेळा हा साऱ्या जगाच्या कुतूहलाचा विषय आहे. यंदाच्या कुंभमेळ्यातील साऱ्या चोख व्यवस्था, उत्तम सुरक्षा व आदर्श स्वच्छता हा सर्वांचाच कौतुकाचा विषय ठरला.**

कुंभमेळा! जगातील सर्वात मोठा सांस्कृतिक – धार्मिक महापर्व सोहळा. कोणतेही औपचारिक निमंत्रण न देता कोट्यावधी हिंदू भाविकांचा पवित्र नदीकाठी, पवित्र स्नानासाठी, जमणारा महामेळा म्हणजे कुंभमेळा होय! या कुंभमेळ्याची नोंद 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये झालेली असून, दोन वर्षांपूर्वी 'युनो'च्या 'युनेस्को'ने **'जागतिक धरोहर' (वर्ल्ड हेरिटेज)** म्हणून भारतातील या कुंभमेळ्यांना सन्मानाच्या यादीत स्थान दिलेले आहे. कुंभमेळा हा भारताच्या प्राचीन सांस्कृतिक परंपरांचा वैभवशाली वारसा आहे. कुंभ म्हणजे एक महापर्व असून, प्रांत, भाषा, जाती-वर्ण, चालीरीती, खानपान, पंथ-संप्रदाय असे सारे भेद विसरून अवघा हिंदू समाज कुंभमेळ्यानिमित्त समरसतेने एकत्र येतो. भारतीय-राष्ट्रीय एकात्मतेचे कुंभमेळा हे विराट दर्शन आहे.

यंदाच्या वर्षी उत्तर प्रदेशातील 'प्रयागराज' येथील गंगा – यमुना-सरस्वती नद्यांच्या संगमावर अर्ध कुंभमेळा संपन्न झाला. त्याचा कालावधी दि. १५ जानेवारी २०१९ ते ४ मार्च २०१९ असा ५५ दिवसांचा होता. भक्ती, ज्ञान यांचा अनुठा, अद्‌भुत संगम म्हणजे कुंभमेळा होय!

### ।। ५५ दिवसांचा महापर्व सोहळा ।।

दि. १५ जानेवारी रोजी संक्रांतीच्या पर्वकाळी कुंभमेळ्यातील पहिल्या शाहीस्नानाने कुंभमेळ्याचा प्रारंभ झाला. दि. ४ फेब्रुवारी रोजी मौनी अमावस्येच्या दिनी कुंभमेळ्यातील दुसरे शाहीस्नान झाले. तर, दि. १० फेब्रुवारी, वसंतपंचमीच्या मंगल दिनी तिसरे शाहीस्नान अत्यंत उत्साहात, थाटामाटात, धार्मिक विधिविधानांद्वारे संपन्न झाले. दि. ४ मार्च रोजी, महाशिवरात्रीच्या दिनी अखेरचे स्नान होऊन कुंभमेळ्याची सांगता झाली. यंदाच्या या कुंभमेळ्यात सुमारे १५ कोटी भाविकांनी पवित्र स्नानाचा आनंद व अनुभव घेतला.

## ।। कुंभमेळ्याची कथा ।।

कुंभमेळ्याला हजारो वर्षांची पूर्वपरंपरा आहे. महाभारत व अनेक पुराणांमध्ये कुंभमेळ्याचे माहात्म्य वर्णन केलेले आहे. कुंभमेळ्याच्या संदर्भात तीन कथा प्रचलित आहेत –

**१) महर्षी दुर्वास ऋषीसंबंधित कुंभमेळा कथा**

**२) कश्यपऋषीपत्नी – कद्रु–विनता यांची कथा**

**३) समुद्रमंथन कथा (मोहिनीअवतार कथा )**

या तीनपैकी समुद्रमंथनाची कथा सर्वाधिक लोकप्रिय व जनरूढ कथा आहे. या कथा प्रतीकात्मक आहेत. त्यातून दार्शनिक बोध करण्याचा प्रयत्न आहे. समाजातील सत्प्रवृत्ती व दुष्प्रवृत्ती यांचा संघर्ष यातून दाखविण्यात आलेला आहे. देव विरुद्ध दैत्य, सूर विरुद्ध असूर अशा या द्वंद्वात – संघर्षात समुद्रमंथनाची कथा गुंफलेली आहे. देव आणि दैत्यांमध्ये समुद्रमंथन झाल्याची कथा आबालवृद्धांना चिरपरिचित आहे. मेरु पर्वताची रवी (मंथा) करून त्या रवीभोवती वासुकी नागाची दोरी गुंडाळली जाते. नागाच्या तोंडाकडच्या बाजूला सर्व दैत्य व शेपटीच्या बाजूला सर्व देव उभे राहून समुद्राचे मंथन करतात. त्या मंथनातून चौदा रत्ने बाहेर निघतात. त्यात अमृतकलशही असतो. अमृत म्हणजे अमरत्वाची संजीवनी. या अमृतकलशासाठी देव व दैत्य यांच्यात जोरदार संघर्ष होतो. इंद्रदेव आपल्या पुत्रास (जयंत) तो अमृतकुंभ घेऊन लपवून ठेवण्यास सांगतात. त्यावेळी दैत्यांपासून अमृतकुंभ लपवून ठेवण्यासाठी जयंत तो ठिकठिकाणी घेऊन जातो. या धावपळीत त्या कुंभातील काही अमृत थेंब भारतवर्षातील ४ ठिकाणी पडतात आणि ती क्षेत्रे पवित्र, पावन तीर्थक्षेत्रे म्हणून विख्यात होतात. ही चार ठिकाणे म्हणजे १) हरिद्वार (उत्तराखंड) २) प्रयागराज (उत्तर प्रदेश) ३) उज्जैन (मध्य प्रदेश) ४) नाशिक (महाराष्ट्र).

या प्रत्येक ठिकाणी दर १२ वर्षांनी पाळीपाळीने महाकुंभमेळा संपन्न होतो. तसेच दर ६ वर्षांनी अर्ध कुंभमेळा होतो. या क्रमाने दर ३ वर्षांनी या ४पैकी एका स्थानी कुंभमेळा होत असतो. या कुंभमेळ्यात स्नानविधीला मुख्य स्थान आहे. त्यामुळे कुंभमेळा हा नदी–संगमाच्या किनाऱ्यावरच होतो. हरिद्वारला **गंगा**, प्रयागराजला **गंगा–यमुना–सरस्वती त्रिवेणी संगम**, उज्जैनीला **क्षीप्रा**, नाशिकला **गोदावरी** या नद्यांच्या काठी हे कुंभमेळे भरतात.



### ।। विविध आखाड्यांचा विशेष मान ।।

या कुंभमेळ्यामध्ये तपस्वी साधू-संतांच्या विविध आखाड्यांचे विशेष महत्त्व असते. या आखाड्यांच्या शाहीस्नानाचा सोहळा हा नेत्रदीपक व अद्‌भुत असतो. हत्ती-घोडे, विविध वाद्ये, शंख, तुताऱ्या, डमरू यांच्या जयघोषात विविध मानाच्या आखाड्यांतील साधू-संत वाजत-गाजत भव्य मिरवणुकीने शाहीस्नानासाठी येतात. या मिरवणुकींना 'पेशवाई' म्हटले जाते. या प्रमुख आखाड्यांमध्ये आगम आखाडा, जुना आखाडा, निरंजनी आखाडा, दसनामी, तसेच अनेक इतर आखाडे आहेत. या आखाड्यांमध्ये काही शैव पंथीय आखाडे आहेत, तर काही वैष्णव पंथीय आखाडे आहेत. या कुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या हजारो नागा साधूंचे भक्तांना विशेष आकर्षण असते. त्यांची केशभूषा, भस्माने माखलेली शरीरे, हातातील शस्त्रे, एवढेच नव्हे, तर रुद्राक्षांच्या माळांसमवेतच काहींच्या गळ्यात झळकणारे सोन्याचे दागिने, या साऱ्यांबद्दल भाविकांना विलक्षण कुतूहल असते. विशेषतः विदेशांतून येणाऱ्या विदेशी अभ्यासकांना या नागा साधूंचे जीवन हा थक्क करणारा विषय असतो. एकूणच कुंभमेळा म्हणजे आस्था-श्रद्धा-निष्ठा यांचा अद्‌भुत सोहळा आहे.

### ।। अभूतपूर्व चोख व्यवस्था ।।


यंदाच्या अर्धकुंभमेळ्याची उत्तर प्रदेश सरकारने केलेली व्यवस्था हा जागतिक चर्चेचा विषय ठरला आहे. कोणत्याही समस्या, गैरव्यवस्था, गडबडगोंधळ या ५५ दिवसांच्या व १५ कोटी लोक जमलेल्या सोहळ्यात झाली नाही. सर्व साधू-संत व भाविक भक्त, सर्वसामान्य लोक कुंभमेळ्याच्या व्यवस्थेवर कमालीचे संतुष्ट झाले. ४ प्रकारच्या निवास व्यवस्था चोखपणे करण्यात आल्या होत्या. सर्व काही, राहणे-जेवण मोफत असा एक भाग होता, तर विदेशांतून येणाऱ्या श्रीमंत पर्यटक, अभ्यासक, एनआरआय भाविकांसाठी दर दिवसाला २००० ते १ लाख अशा भाड्यांचे तंबू उभारण्यात आले होते. ट्रॅफिक जाम होणार नाही, चेंगराचेंगरी होणार नाही याचे विशेष नियोजन करण्यात आले होते. अभूतपूर्व स्वच्छता नजरेत भरण्यासारखी होती. १ लाख २२ हजार तात्पुरत्या शौचालयांची उभारणी, २०,००० कचराकुंड्या व त्या त्वरित साफ करणाऱ्या सफाईच्या शेकडो फिरत्या गाड्या. तसेच, ४१ ठिकाणी ३२०० हेक्टर जागा पार्किंगसाठी निर्माण करण्यात आली होती. २०० वॉटर टँकर, १००० सीसीटीव्ही कॅमेरे, संगमावर २२ प्लटून पूल, २००० डिजिटल मार्गदर्शक बोर्ड अशी चोख व दक्ष व्यवस्था प्रथम करण्यात आली होती. त्याशिवाय म. गांधीजीवनदर्शन, भारतीय प्राचीन संस्कृती व इतिहासदर्शन, भारतीय नृत्य अशी अनेक प्रदर्शने लावण्यात आली होती. त्यासाठी सर्वत्र 'कलाग्राम' साकारण्यात आले होते.

प्रयाग संगमाजवळील सम्राट अकबराच्या किल्ल्यात, हिंदू भाविकांना परम पवित्र वाटणारा भव्य असा 'अक्षयवट' शेकडो वर्षे दर्शनास बंद होता. पुढे ब्रिटीशांनीही तो खुला केला नव्हता व भारत स्वतंत्र होऊनही तो हिंदूंना दर्शनास खुला नव्हता. पण, यंदा उत्तर प्रदेश सरकारने विशेष प्रयत्न करून तो 'अक्षयवट' सर्वांसाठी दर्शनार्थ खुला केला. ही या अर्ध कुंभमेळ्यानिमित्त घडलेली ऐतिहासिक घटना आहे.

कुंभमेळा हा भारतीयांचा महापर्व मेळा आहे. भारतीय धर्मपरंपरेमध्ये पवित्र नद्यांच्या स्नानविधीला विशेष महत्त्व आहे. त्यात संगमाकाठी संपन्न होणारा अर्ध कुंभमेळा अधिक पुण्यप्रद, कल्याणदायी, मोक्षदायी मानला जातो. हजारो वर्षांची प्राचीन परंपरा असणारा व एवढ्या प्रचंड कोट्यावधी भक्तांच्या सहभागाने संपन्न होणारा कुंभमेळा जगातील सर्वोच्च, विराट व अद्‌भुत सोहळा आहे.

– विशेष प्रतिनिधी

रामनवमी उत्सवानिमित्त




संतकवी श्रीधरकृत

# ।। श्री रामविजय ।।

श्रीरामविजय ग्रंथ सुंदर । भक्ती ज्ञान वैराग्य भांडार ।
दृष्टांतरत्ने अपार । माजी सतेज झगमगती ।।

**महाराष्ट्रामध्ये संत एकनाथांचे 'भावार्थ रामायण', संत रामदासस्वामींचे रामायणप्रती लेखन आणि ग. दि. माडगुळकरांचे 'गीतरामायण' भाविकजनांत प्रसिद्ध आहे. त्याशिवाय पंढरपूरनिवासी संतकवी श्रीधर (नाझरेकर) विरचित 'श्री रामविजय' गावोगावी सामूहिकरीत्या वाचला जाणारा पारमार्थिक ग्रंथ आहे. अशा सुपरिचित ग्रंथ व ग्रंथकाराचा परिचय –**

**सं**त एकनाथ (पैठण) यांनी लिहिलेला **'भावार्थ रामायण'** हा मराठी भाषेतील रामचरित्राचा गुणगौरव करणारा पहिला वीररसपूर्ण ग्रंथ आहे. या ग्रंथाने मोगलकालीन इस्लामी आक्रमकांच्या धर्मांध राजवटीत स्वधर्माचे व स्वत्वाचे रक्षण करण्याचे महान ऐतिहासिक राष्ट्रीय कार्य केलेले आहे. या ग्रंथाचा वारसा सांगत पुढे समर्थ रामदासांनी रामभक्ती व हनुमंतशक्तीचे जागरण केले व हिंदवी स्वराज्य स्थापनेस अनुकूल वातावरण तयार केले. परकीय जुलमी राजवटीत निस्तेज झालेल्या समाजातील 'क्षात्रतेज' जागृत करण्याचे कार्य या संतांनी केलेले आहे. हे संतांचे व संतसाहित्याचे आपणावर थोर ऋण आहे.

भारतीय भावविश्वामध्ये भगवान राम आणि भगवान कृष्ण यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. राम आणि कृष्णभक्ती भारतीय एकात्मतेचे अधिष्ठान आहे. रामभक्तीचे हे समाजातील - लोकमानसातील अनन्य स्थान लक्षात घेऊन श्री साईबाबांनी भक्तांना शिर्डीत रामनवमीचा उत्सव करण्यास अनुमती दिली.

**शके अठराशें तेहतीस सालीं ।**
**रामनवमी प्रथम झाली ।**
**उरुसापोटी जन्मास आली ।**
**तेथूनि चालली अव्याहत ।।**

(श्री साईसचरित, अ. ६/ओ. ५९)

श्री साईबाबांच्या शिर्डीनगरीत शके १८३३ (इ.स. १९११) साली सुरू झालेल्या रामनवमी उत्सवास आता १०८ वर्षे झाली आहेत. महाराष्ट्रात साजरा होणाऱ्या रामनवमी उत्सवातील एक मोठा सोहळा म्हणून या सोहळ्यास देशभरातून साईभक्त शिर्डीत येतात व रामनवमी उत्सवाचा आनंद लुटतात.

संत एकनाथ, संत रामदास, संतकवी श्रीधर, पंडित कवी मोरोपंत, संत गोंदवलेकर महाराज आणि अगदी अलीकडच्या काळातील कै. नानासाहेब धर्माधिकारी यांचे महाराष्ट्रात रामभक्तीच्या प्रचार-प्रसारातील योगदान अपूर्व आहे. या रामभक्तांपैकी संतकवी श्रीधर (इ.स. १६५९ ते १७३०) आणि त्यांचा **'श्री रामविजय'** यांचा परिचय आपण करून घेणार आहोत.

श्रीधर नावाच्या महाराष्ट्रात तीन महान व्यक्ती होऊन गेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्याचा व काळाचा नेहमीच जनमनात गोंधळ दिसतो. एका




श्रीधराचे कार्य दुसऱ्या श्रीधराच्या नावे सांगितले जाते. हे तीन श्रीधर म्हणजे (१) संतकवी श्रीधर (नाझरेकर) हे पंढरपूरनिवासी. (२) संस्कृतचे प्रकांड पंडित आचार्य श्रीधर. यांची भागवतावरील संस्कृत टीका प्रसिद्ध आहे. (३) समर्थ रामदासस्वामींचे शिष्य श्रीधरस्वामी (वरदहळ्ळीकर). यांनी सज्जनगडावर राहून खूपच कार्य केलेले आहे. या तीन श्रीधरांपैकी आचार्य श्रीधर आणि समर्थशिष्य श्रीधरस्वामी हे ब्रह्मचारी-संन्यस्त होते. तर पंढरपूरनिवासी संतकवी श्रीधर (नाझरेकर) हे गृहस्थाश्रमी होते. त्यांना ३ मुलगेही होते.

**हरिविजय** आणि **रामविजय** या ग्रंथांनी उभ्या महाराष्ट्रात गावोगावी लोकप्रिय झालेले संतकवी श्रीधर यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील माण नदीकाठी वसलेल्या 'नाझरे' या

गावी इ.स. १६५८ साली झाला. त्यांचे वडील ब्रह्मानंद हे थोर योगीराज व विद्वान पंडित होते. श्रीधरांचे सर्व शिक्षण वडिलांजवळच झाले. वडील ब्रह्मानंद हेच श्रीधरांचे पारमार्थिक गुरु होते. वयाच्या विसाव्या वर्षी श्रीधरांचे वडिलांसमवेत नाझरे सोडून पंढरपुरी स्थलांतर झाले व नाझरेकर परिवार कायमस्वरूपी पंढरपूरनिवासी झाला; आणि पंढरपूर हेच श्रीधरांच्या वाङ्मयीन कार्याचे मुख्य स्थळ राहिले. इथेच त्यांनी अनेक प्रकारची स्फुट काव्ये आणि सुख्यात झालेले सर्व ग्रंथ लिहिले. श्री पांडुरंगाच्या कृपेमुळेच माझे हे लिखाण झाले असून, मी केवळ निमित्तमात्र असल्याचा भाव श्रीधरांनी ग्रंथामध्ये ठिकठिकाणी व्यक्त केलेला आहे.

श्रीरामविजय वरद ग्रंथ ।
कर्ता याचा पंढरीनाथ ।
श्रीधर नाम हे निमित्त ।
पुढे केले उगेचि ।।

(अ. ४०/३५)

**रामविजय ग्रंथाची वैशिष्ट्ये**

संतकवी श्रीधरांचा हा रामविजय ग्रंथ ४० अध्यायांचा असून, त्यामध्ये ९१४७ ओव्या आहेत. श्रीधराने इ.स. १७०२ (शके १६२४) साली आपला ८१३९ ओव्यांचा, ३६ अध्यायांचा हरिविजय ग्रंथ पूर्ण केला आणि त्यानंतर 'रामविजय' ग्रंथ लिहिण्याचा शुभारंभ केला. केवळ ८ महिन्यांत हा ग्रंथ पूर्ण केला. या ग्रंथाचा मुख्य आधार 'वाल्मीकी रामायण' हा असला, तरी श्रीधरांनी विविध १९ रामायणांचा अभ्यास करून, त्यातूनही काही कथा/प्रसंग आपल्या रामविजयात घेऊन तो अधिकाधिक रंजक, रसाळ व प्रबोधक केलेला आहे. श्रावण, शुद्ध सप्तमी ऊर्फ भानुसप्तमी, शके १६२५ दिनी पंढरपूरमध्ये हा ग्रंथ पूर्ण झाल्याचे श्रीधरांनी अध्याय ४० मध्ये म्हटलेले आहे.

शके सोळाशे पंचवीस ।
सुभानुनाम संवत्सरास ।
भानुसप्तमी शुद्ध विशेष ।
श्रावण मास विख्यात पै ।।

(४०/२०५)

पंढरीक्षेत्री निश्चयेसी ।
रामविजय संपविला ते दिवशी ।।

(४०/२०६)

श्रीधरांच्या रामविजय ग्रंथामध्ये **बालकांड** (अध्याय ८), **अयोध्याकांड** (अध्याय ४), **अरण्यकांड** (अध्याय ४), **किष्किंधाकांड** (अध्याय २), **सुंदरकांड** (अध्याय ५), **युद्धकांड** (अध्याय १०) आणि **उत्तरकांड** (अध्याय ७) असे सात कांड आहेत. मराठी भाषेत इतके सोपे, सुलभ आणि रसाळ असे दुसरे काव्य नाही, असा अनेकांचा अभिप्राय आहे आणि उभ्या महाराष्ट्रात गेली ३०० वर्षे ग्रामीण भागांतील गावागावांमध्ये या ग्रंथाचे दरवर्षी सामूहिक पारायण होत आहे. भाविक भक्तांचे असे अद्‌भुत प्रेम कोणत्याही धार्मिक–पारमार्थिक ग्रंथास लाभलेले नाही, ही श्रीधरांच्या काव्यगुणांची महती आहे.

रसाळ, प्रासादिक भाषा, दृष्टांतांची रेलचेल, नवरसाचा उत्तम परिपोष, अर्थालंकार व शब्दालंकार, उपमा, रूपक यांनी हा ग्रंथ आकर्षक व चित्तवेधक झालेला आहे. पण, श्रीधरांची ही काव्यरचना केवळ रंजनासाठी नसून, भाविक भक्तांचे ऐहिक व पारमार्थिक कल्याण, उन्नयन हा ग्रंथलेखनाचा मुख्य उद्देश आहे. श्रीधर ग्रंथसमाप्तीच्या ओव्यांत म्हणतात –


या ग्रंथासी वरदान ।
पंढरीनाथे दिधले आपण ।।
वाचिती पढती तजे अनुदिन ।
होय ज्ञान अद्‌भुत तया ।।३६।।

संतकवी श्रीधर यांनी अवतारकार्यपूर्ती होताच माघ, वद्य तृतीया, शके १६५१ (इ.स. १७२९) रोजी देह ठेवला. त्यांची समाधी पंढरीत चंद्रभागेकाठी आहे.

– विद्यानंद

रामनवमी उत्सवानिमित्त





# साईचरित्रामधून घडणारे साई 'राम' दर्शन

सौ. गौरी अमित काटे
रत्नागिरी

रमते राम आयोजी आयोजी, उदियों की गोणियाँ लायोजी... साईंच्या ओठांवर असणारे हे नेहमीचे गाणे! ते म्हणतात, राम आले आणि सोबत गोणी (पोती) भरभरून उदी घेऊन आले! प्रत्यक्ष साईंच्या तोंडची मंजुळ वाणी आणि श्री रामाचे स्मरण करत धुनीतील उदीने भरलेला त्यांचा हात ज्या ज्या भक्तांच्या डोक्यावर पडला त्यांचे अहोभाग्य!

साईबाबांनी अनेकांना रामाच्या पायी स्थिर केले. काहींना रामाच्या रूपात दर्शन दिले. वेळोवेळी रामाच्या कथा सांगितल्या. साईबाबा दरवर्षी रामनवमी साजरी करून घेत. अशा अनेक प्रसंगांनी श्री साईसच्चरित ओतप्रोत भरलेले आहे. प्रभू श्री रामचंद्राचे स्मरण सर्वांना कायम रहावे यासाठी साईबाबा सदैव प्रयत्नशील होते; कारण या दुनियेत जगताना माणसांना एकाचवेळी अनेक भूमिकांचा योग्य समतोल राखणे

शक्य होत नाही. आईची बाजू घेऊ की बायकोची? किंवा मुलाच्या गॅदरिंगला जाऊ की बॉसच्या पार्टीला? अशा लहानसहान पेचात जीवाचे किती मोठे हाल होतात हे सद्गुरू साईनाथ जाणून आहेत. रामाचे चरित्र जिथे वाचले आणि समजून घेतले जाते तिथे भवसागरातील या पेचांमधून आपली काळजी प्रभू श्री राम आजही घेतात.

मुळात राम स्वतः अशा अनेक द्विधा मनःस्थितीतून सावरले आहेत. शिक्षण पूर्ण करून देशाटन आणि नंतरच्या वनवासातील काळात रावणाचा हाहाकार आणि लोकांची अगतिकता पाहून विषण्ण झालेले राम. सीतेचा त्याग करण्याचा निर्णय घेणारे राम. भरताच्या हट्टाला मानून पादुका देणारे राम... आणि यमदेवतेच्या बंधनात अडकून लक्ष्मणाचा त्याग करणारे राम! लीलया त्यांनी हे कठीण प्रसंग निभावून नेले आणि प्रत्येक नात्याला, प्रत्येक भूमिकेला न्याय दिला. यासाठीच रामाला रोज पूजले जाते, रामायण वाचले जाते; मनात उत्पन्न होणाऱ्या रावणरूपी विकारांना जाळले जाते.

रावणाने ब्रह्मदेवाकडून वरदान घेतले होते की मला कुणीही देव किंवा राक्षस मारू शकणार नाही असा वर द्या. कुणी माणूस आपल्याला मारेल असे रावणाला – ऋषी विश्रवामुनी आणि राक्षस कुळातील कैकसा यांच्या बुद्धिमान आणि हट्टी पुत्राला – वाटले नव्हते. रावण जवळ जवळ अमर झाला. आपले शीर दहा वेळा महादेवाला अर्पण करून तो बलवान तर झाला होताच, पण मुळातच तामसी असलेला रावण या शक्तींमुळे दुराचारी झाला. एकदा रावणाने कुबेराचा मुलगा नल याच्या पत्नीवर – रंभा अप्सरेवर – अत्याचार केले होते. त्यावेळी क्रोधित होऊन तिने रावणाला शाप दिला, यानंतर जर कुणा स्त्रीवर बळजबरी करशील तर तू तात्काळ मृत्यू पावशील. म्हणूनच रावण अशोकवनातील सीतेच्या अनुमतीची वाट पाहत राहिला...

विष्णूचा पूर्ण मानवावतार असणाऱ्या रामरायाने रावणाचा वध केला, तेव्हा रावणाचे वय होते काही लाख वर्षे, तर रामाचे वय होते केवळ सत्तावीस वर्षे! रामाचे प्राथमिक गुरू वशिष्ठमुनी आणि त्यानंतरचे गुरू, जगाला गायत्रीमंत्राची भेट देणारे, मंत्रतंत्र आणि योगशक्तीवर प्रचंड सत्ता असणारे विश्वामित्र होय! गुरूंकडून प्राप्त झालेल्या विद्येच्या बळावर रामाने रावणाचा वध केला. साक्षात् नारायण असणाऱ्या रामाने रावणाला कोणत्याही दैवी शक्तींचा उपयोग न करता मारले. कारण ब्रह्मदेवाचा आशीर्वाद! कृष्णावतार जसा विविध दैवी लीलांनी भरलेला होता तशा दैवी शक्ती रामाने वापरल्या नाहीत. अशा या गुणोत्तम रामाला साध्य करून त्याच्या अनेक गुणांपैकी केवळ एक गुण जरी आपल्या अंगी आपण बाणविला तर आपल्या आयुष्याचे सोने होईल, असे साईबाबा सांगत.

रावणाच्या वधानंतर बिभीषणाकडून रावणावर नीट अंत्यसंस्कार करून घेतल्यावर मगच रामराया परत अयोध्येला निघाले... राम निघाले, तेव्हा बिभीषण चकित झाला, स्वामी, आपण कुठे निघालात? रावणाला जिंकल्यावर त्याच्या मालकीची प्रत्येक वस्तू आपली आहे. हे राज्यही आपले आहे; आणि मीही आपला दास आहे. त्यावर राम म्हणाले, माझी सीता मला मिळाली! आता माझे इथे काय काम!

मूळ कुबेराने वसवलेली ही सोन्याची लंका रावणाने बळजबरीने त्याच्याकडून हिसकावून घेतली होती. रामाने इथे राज्य करावे म्हणून बिभीषणासह कुबेरानेदेखील रामरायाची मनधरणी केली, तरीही लंकेवर कोणताही अधिकार न ठेवता प्रभू श्री राम परत फिरले. अखेर कुबेराने आणि बिभीषणाने विनंती केली की आपण मारुतीच्या खांद्यावरून जाण्याऐवजी पुष्पक विमानातून जावे. रामरायाने ही विनंती मान्य केली; पण एक अट घातली, मी माझ्या सर्व आप्तस्वकीयांसह जाईन...! कुबेराच्या मालकीचे असणारे हे पुष्पक विमानही रावणाने बळजबरीने घेतले होते. याचाच

उपयोग त्याने सीताहरणासाठी केला होता. हे स्वयंचलित पुष्पक विमान विस्मयकारक होते. त्यात एक लाखाहून अधिक माणसे बसू शकत होती. गरजेनुसार या विमानाचा आकार लहान-मोठा होत असे. काही अयोध्यावासी रामाचे युद्ध सुरू झाले आहे हे कळल्यावर रामसेतू पार करून लंकेला आले होते. सीता, लक्ष्मण, हनुमान, जांबवंत, सर्व वानरवीर आणि अयोध्यावासी अशा सुमारे दहा हजार लोकांना सोबत घेऊन श्री राम पुष्पक विमानातून लंकेहून भारतात, अयोध्येत आले.

लंकेहून परत आलेली जानकी अग्नीइतकीच पवित्र आहे, याविषयी रामरायाच्या मनात तिळमात्र शंका नव्हती. पण, राज्यातील काही अज्ञानी स्त्री-पुरुष त्यावरून निंदा करू लागले - रावणाच्या घरी राहून परत आलेल्या सीतेला आपल्या राजाने घरात कसे ठेवले? अशी कुणीही स्त्री कुठेही जाईल आणि परत येईल. मग तिच्या पतीला तिलाही परत घरात घ्यावे लागेल. जसा राजा वागणार, प्रजेलाही तेच करावे लागणार; हे तर नीतीच्या विरुद्ध आहे. लोकांचे हे बोल ऐकून राम फार दुःखी झाले. एका सीतेच्या पतीपेक्षा लाखो अयोध्यावासियांच्या राजाने जो निर्णय घ्यायला हवा होता तोच रामरायाने घेतला आणि लक्ष्मणाकरवी रथातून गर्भवती सीतेला तमसा नदीच्या काठावरील नयनरम्य वाल्मीकीआश्रमात ठेवले. वाल्मीकीऋषी रामाच्या जन्मापूर्वीपासूनच रामाची भक्ती करत होते. सीतेला दुःख होणे स्वाभाविक होते. पण ती एक महान पत्नी होती. पूर्वी राम वनवासात जायला निघाले होते तेव्हा वशिष्ठमुनी आणि सर्व मंत्रीगणांनी ठरविले होते की सीतेला अयोध्येची साम्राज्ञी करू. पण, ते पद नाकारून रामासोबत अरण्यात रहाणे स्वीकारणारी सीता, यावेळीही धैर्याने वाल्मीकींच्या आश्रमात रहाते. कुश आणि लव यांना जन्म देते, त्यांच्यावर चांगले संस्कार करते, त्यांच्या पित्याच्या शौर्याचे, उत्तम गुणांचे गोडवे गाते. लक्ष्मणानंतर रामाला खरे कुणी पूर्ण जाणले असेल तर ते सीतेने...!

सीतेचा त्याग रामाने एक राजा म्हणून केला; पण पत्नीवियोगाने एक पती कायमचा दुःखी झाला. तरीही रामरायाने अयोध्येचा कारभार आणि विकास तितक्याच ताकतीने, प्रेमाने, आदर्शवत केला, हे विशेष! ही काही साधीसोपी गोष्ट नाही. सीता रामाच्या हृदयात एकमेव राहिली. त्या काळी अनेक विवाह करण्याची प्रथा होती. खुद्द दशरथराजाच्या चार राण्या आणि तीनशेहून अधिक पत्नी होत्या. पण, रामाने लौकिक अथवा अलौकिक विवाह तर सोडाच, अश्वमेधयज्ञासाठी नाममात्र विवाहदेखील केला नाही. त्याने सीतेचीच सुवर्णप्रतिमा बनविली आणि तिच्यासह यजमानविधी केले.

रामाची भक्ती करताना त्याचे चरित्र समजून घेणे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. कोणता प्रसंग, कोणती परिस्थिती त्याने कशी हाताळली, हे जाणून घेतल्याने आपले आपल्या जीवनातील कष्ट आणि दुःख कमी होतात. विवेक येतो, चांगले विचार येतात. जीवनभर दुःख सहन करणारा रामलल्ला आतून-बाहेरून शांत होता आणि आपली विहित कर्तव्येदेखील करत होता. सीतेच्या विरहाने शोकाकुल होऊन सीते... अशी आर्त साद घालणारा जसा राम, तसाच कुश आणि लव यांना राज्य सुपूर्द करून शरयू नदीमध्ये समाधानाने आत्मसमर्पण करणारा राम! त्याला समजून घेणे, हीच खरी त्याची भक्ती! रामाला जाणले, राम उमगला की आपल्या जीवनातील समस्यांवर एकेक पर्याय मिळू लागतात. यासाठीच साईबाबा भक्तांच्या उद्धारासाठी रामाचे गुण सर्वांना सांगत. साईअवतारकाळातील भेटस्वरूप प्राप्त राम, सीता, लक्ष्मण आणि मारुतीच्या मूर्ती आजही आपण साईसमाधिमंदिराच्या बाजूला असणाऱ्या वस्तुसंग्रहालयात पाहू शकतो.

शिर्डी संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित या ग्रंथात ६व्या अध्यायातील रामजन्मोत्सवाचे भारदस्त

वर्णन आहे. १२व्या अध्यायात एक श्री रामभक्त डॉक्टर जे म्हणत असतात, साईबाबांच्या पाया पडायचा आग्रह मला करू नका, मी पाया पडणार नाही... तेच साईदर्शन घेतात, चट्कन बाबांच्या पाया पडतात आणि म्हणतात, मी साईबाबांच्या जागी श्यामवर्ण, सुंदर, कोमल, सुरेख रामाला पाहिले. ही कथा वाचनीय आहे. साईबाबांनी या डॉक्टरांच्या आणि त्यांच्या इष्टदेवतेच्या आड येणारा त्यांचा अहंकार दूर करून श्री रामाच्या पायी स्थिर केले. २७व्या अध्यायात दादासाहेब खापर्डे यांच्या पत्नीला साईबाबा हळू, गोड आवाजात म्हणतात, आई, राजाराम... राजाराम असे तोंडाने म्हणत जा, म्हणजे तुझे मन शांत होईल आणि अमर्याद कल्याण होईल...! या सुंदर प्रसंगाचे वर्णन आले आहे. बाबांचे मन किती कोमल आणि प्रेमळ होते, भक्तांशी ते कसे मायेने आणि आदराने बोलत, हे वाचून भरून येते. बाबा आपल्या अवतीभोवतीच आहेत असे वाटते. वाचकांनी जरूर वाचावे. हे श्री साईसच्चरित लिहिणारे खुद्द दाभोलकर ऊर्फ हेमाडपंत यांना आलेला १९व्या अध्यायातील श्री रामनामाचा अनुभव वाचनीय आहे. साईंच्या अनुभवांती हेमाडपंत लिहितात, रामनाम जिथे म्हटले जाते तिथे विष्णूचे सुदर्शन चक्र फिरते आणि कोट्यवधी विघ्नांचा नाश करते.

एकदा पार्वतीने महादेवांना विचारले, आपण सतत ध्यान करता... कुणाचे करता? महादेव म्हणाले, मनोरमे पार्वती, मी रामाचे ध्यान करतो आणि त्याचेच नाम जपतो. अशी ही जीवाला आराम देणारी 'राम' ही दोन अक्षरे साई या नामासोबत सहज रुळली! ओठांवर पट्कन बसली आणि नामात चट्कन उतरली! जणू श्रद्धेने येणारी शांती आणि मग आपोआप सबुरी.

... ओम साईराम.

(संदर्भ : भागवत पुराण, वाल्मीकी रामायण)


## निवेदन

'साईलीला' द्वैमासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशिलाबद्दल दरवर्षी फेब्रुवारीनंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाचे निवेदन.


| | | |
|---|---|---|
| १. | प्रकाशनाचे स्थळ : | साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४. |
| २. | प्रकाशनाचा कालावधी : | द्वैमासिक |
| ३. | मुद्रकाचे नाव : | मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |
| | राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| | पत्ता : | साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४. |
| ४. | प्रकाशकाचे नाव : | मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |
| | राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| | पत्ता : | साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४. |
| ५. | संपादकाचे नाव : | मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |
| | राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| | पत्ता : | साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४. |

६. हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे, त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागीदार यांची नावे व पत्ते : श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (धार्मिक चॅरिटेबल संस्था)

मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या पदाद्वारे जाहीर करण्यात येते की, वरील तपशील सदर पदाकडील माहितीप्रमाणे व समजतीप्रमाणे सत्य आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
(प्रकाशकाची सही)

रामनवमी उत्सवानिमित्त



# समर्थांची रामोपासना

## एक चिंतनात्मक लेख

प्रा. पंढरीनाथ पाटील

**रामदास संतप्रवर। सोडूनियां गोदातीर। प्रगट झाले कृष्णातटाकावर। जगदुद्धाराकारणें।। (४.३७) तैसेचि हे योगेश्वर साई। असे समर्थ रामदासांचे साईचरित्रामध्ये हेमाडपंतांनी वर्णन केलेले आहे. समाजामध्ये स्वधर्म व स्वदेशाविषयी स्वत्वाची भावना निर्माण करण्यासाठी, राष्ट्रभावनेचे स्फुल्लिंग चेतवण्यासाठी समर्थांनी कोदंडधारी देवबंधविमोचक श्री रामाची आणि महाप्रतापी शक्तिदेवता म्हणून हनुमंताची उपासना पुरस्कारली. समर्थांच्या घराण्यात रामोपासना पूर्वापार चालत आलेली होती.**

### आरंभिक

महाराष्ट्राच्या संतपंचकातील एक प्रमुख संत म्हणून समर्थ रामदासस्वामींच्या अपूर्व योगदानास कृतज्ञतापूर्वक वंदन केले जाते. महाराष्ट्राला फार मोठी वैभवशाली संतपरंपरा आहे, त्यापैकी संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम आणि संत रामदासस्वामी यांना महाराष्ट्राचे 'पंचप्राण' म्हणूनच गौरविले जाते. संतपंचकातील समर्थ रामदासांबद्दल थोर संशोधक, अभ्यासक कै. रा. चिं. ढेरे म्हणतात – ''महाराष्ट्रातील संतपंचायतनातील समर्थ हे प्रथम 'रामदास' होते आणि मगच 'समर्थ' बनले. त्यांच्या सामर्थ्याचे रहस्य त्यांच्या 'रामदास्या'त आहे.'' (संदर्भ

: विविधा) समर्थ रामदासस्वामी यांच्या जीवनात प्रभू रामचंद्रांचे स्थान, इष्ट दैवत, सद्गुरु, सखा अशा वेगवेगळ्या प्रकारे दिसून येते.

१) जांबमधील बाल्यकाळातच घराण्यातील रामोपासना करीत असतानाच समर्थांना श्री रामाचा साक्षात्कार झाला व अनुग्रह लाभला. या ठिकाणी श्री रामाचे स्थान 'सद्गुरु' म्हणून आहे. समर्थ म्हणतात – राम माझा स्वामी राव अयोध्येचा ।

२) नाशिक – टाकळी येथील तपश्चर्येच्या काळात श्री रामाचे स्थान 'उपासना दैवत' म्हणून आहे. 'राम उपासना ऐसी । ब्रह्मांड व्यापिनी पहा', 'उपासनेचा आश्रयो मोठा ।' ही पदे त्याची उदाहरणे आहेत.

३) दासबोध – आत्माराम आदि लेखनकाळात श्री राम ही समर्थांची प्रेरणादेवता आहे. 'समर्थ कृपेची वचने।' 'स्वामी कृपेचा लोट आला।' या दासबोध व आत्माराममधील ओव्या पहा.

४) पारमार्थिक – राष्ट्रीय – सामाजिक कार्यात श्री राम हे त्यांचे 'जनजागृतीचे दिव्य पुरुषार्थी साधन' आहे. 'रामाची पदे मानसी धरीन। विश्व उद्धरीन।', 'रघुनाथे स्मरोनी कार्य करावे । ते तात्काळचि सिद्धी जावे ।' ही पदे त्याची साक्षच आहेत. आणि

५) स्वराज्यनिर्मितीच्या कल्पनेमागे 'रामराज्य' हे त्याचे साध्य आहे. अशा प्रकारे समर्थांचे अवघे जीवन व कार्य राममय आहे.

## घराण्यातील रामोपासना

माता रामो मत्पिता रामचन्द्रः ।
स्वामी रामो मत्सखा रामचन्द्रः ।।

बुधकौशिक ऋषींनी रामरक्षास्तोत्रामध्ये व्यक्त केलेल्या, प्रभू रामचंद्रांविषयीच्या भक्तीयुक्त दृढनिष्ठा भावाचे, समर्थ रामदासस्वामींच्या समग्र जीवनकार्यातून आपणास विलोभनीय दर्शन घडते. 'माय बाप बन्धु स्वजन सांगाती । तूचि आदिअंती माहियेर ।।' हा समर्थांचा अभंग श्री रामप्रभूंचे त्यांच्या जीवनातील अनन्य असे स्थान अधोरेखित करणारा आहे. श्री रामचंद्र हे त्यांचे केवळ इष्ट उपासना दैवतच नव्हे, तर जीवन व कार्याचे सारसर्वस्व आहे.

समर्थ रामदासांना रामोपासना लाभली, ती घराण्यात चालत आलेली वडिलोपार्जित उपासना या स्वरूपात. खरं तर ठोसर घराणे मूलतः सूर्योपासक. रामदासांच्या वडिलांचे नावही सूर्योपंत होते व रामदासस्वामींचे जन्मनावही सूर्यवाचक 'नारायण' असे ठेवण्यात आले होते. मूळ सूर्योपासक घराण्यात रामोपासना कशी आली? याविषयी एक प्रसंग समर्थशिष्य अनंत मौनी (तंजावर) यांचे शिष्य मेरुस्वामी लिखित 'रामसोहळा' या ग्रंथात वर्णिलेला आहे. तो प्रसंग असा –

एका सकाळी समर्थांचे वडील सूर्योपंत अंगणात उभे राहून सूर्योपासना करीत असतानाच एक तेजस्वी ब्राह्मण आला आणि त्याने सूर्याजीपंतांना राम, सीता व लक्ष्मण अशा तीन सुंदर मूर्ती देऊन आपण रामोपासना करावी, अशी आर्जवं केली. त्यावर आमचे घराणे सूर्योपासक असून, मी सूर्यावाचून कोणत्याही अन्य देवतेचे दर्शन करीत नाही, असे सूर्याजीपंत त्या ब्राह्मणास म्हणाले.

या राम, सीता व लक्ष्मणाच्या मूर्ती, मूर्तिमंत सूर्यच आहेत, यांच्या उपासनेने तुझ्या कुळाचा उद्धार होईल, असे सांगून तो ब्राह्मण अंतर्धान पावला.

त्या तेजस्वी ब्राह्मणाचे दिव्य रूप, त्याचे सूर्योदयासमयी उपासनेवेळीच येणे आणि राममूर्ती देऊन अंतर्धान पावणे ही सारी घटना सूर्याजीपंतांना सूर्यदेवतेचाच साक्षात्कार व प्रसाद वाटला; आणि त्या दिवसापासून सूर्योपासक ठोसर घराण्यात रामोपासनेचा श्री गणेशा नव्हे, तर रामोदय झाला. हीच घराण्याची रामोपासना समर्थांना बाळकडू म्हणून लाभली. सूर्याजीपंतांनंतर त्यांचे पुत्र व समर्थांचे वडीलबन्धू 'ज्येष्ठ' यांनी आपले उदरनिर्वाहाचे साधन, परंपरागत कुलकर्णीपण सोडून देऊन समर्पित भावाने संपूर्ण वेळ रामोपासना वृद्धिंगत केली.

### अवतारकार्यासाठीच जन्म

समर्थ रामदासस्वामींना (नारायण) वयाच्या केवळ ८व्या वर्षी (इ.स. १६१६ साली) रामदर्शनाचा साक्षात्कार झाला होता. साक्षात्कार ही केवळ एक दिव्य अनुभूतीच नव्हे, तर ती एक सर्वश्रेष्ठ अवस्था आहे. अशी अवस्था प्राप्त करण्यास अनेक वर्षे तपश्चर्या करावी लागते; ती श्रेष्ठतर अवस्था समर्थांना बालवयातच प्राप्त झालेली होती. ही त्यांची या वयातील अवस्था पाहूनच त्यांना प्रभू रामचंद्रांचा अवतार, हनुमंताचा अवतार मानले गेले असल्यास नवल ते काय! समर्थांचा, म्हणजे बाल नारायणाचा जन्मच मुळी चैत्र शुद्ध नवमी, म्हणजे रामनवमीच्याच दिवशीचा. हा केवळ योगायोगच नव्हे, तर एक संकेत होता.

सामान्य माणसे जन्माला आल्यानंतर जीवनाचे उद्दिष्ट शोधतात व मग कार्य करतात. पण, जन्मजात अवतारी पुरुष हे विशिष्ट कार्यसिद्धीसाठीच जन्मलेले असतात. त्यांच्या हातून जे कार्य घडणार ते पूर्वनिर्धारितच असते. निर्धारित कार्यासाठीच ते जन्म घेतात व कार्यसिद्धी होताच आपल्या देहाकृती अवताराची समाप्ती करतात. श्रीमद् शंकराचार्य, संत ज्ञानेश्वर अशा युगपुरुषांनी अल्पवयातच समाधी का घेतली? तर, त्यांनी ज्या अवतारकार्यासाठी जन्म घेतला होता ते सिद्धीस गेले होते म्हणून. कित्येक अवतारी सत्पुरुषांच्या जीवनचरित्रात ही गोष्ट दिसून येते.

समर्थ रामदासांना (छोटा नारायण) आपल्या जीवनकार्याचे स्मरण होते म्हणूनच त्यांनी लग्नमंडपातून आपल्या इष्ट कार्यासाठी मार्गक्रमण केले. सर्वसामान्य लोक त्याला पलायन म्हणतात, पण ते पलायन नसून विधिलिखित इष्ट कार्यार्थ प्रयाण होते.

जांब येथून वयाच्या १२व्या वर्षी घर सोडून समर्थ थेट रामचरणांनी परमपावन झालेल्या नाशिक परिसरात आले व गोदावरीतटी टाकळी येथे त्यांनी कठोर तपाचरण केले. या १२ वर्षांच्या तपश्चर्येने घराण्यातील रामोपासना त्यांनी कळसाला पोहोचविली. 'श्रीराम जय राम जय जय राम' या त्रयोदशी मंत्राचा जपयज्ञ केला. वाल्मीकी ऋषींच्या रामायणाची स्वअक्षरांत प्रतिलिपी केली. अशा प्रकारे ग्रंथाची प्रतिलिपी करून ईश्वरचरणी अर्पण करणे हा भक्तीचाच एक प्रकार आहे.

श्रीराम जय राम जय जय राम ।
ऐसा काही एक धरूनि नेम ।
जप किजे तेणे आत्माराम । जोडेल नेमे ।।

असे समर्थांनी म्हटले आहे. तो केवळ उपदेशच नव्हे, तर ती त्यांची स्वानुभूती आहे. समर्थांसह सकल संतांनी जे जे लिहिले ते ते केवळ कोरडा उपदेश म्हणून नव्हे, तर ती त्यांची स्वानुभूती – प्रचीती आहे.

अनेक तपी, योगी आपले तप, जप, अनुभव, प्रचीती कोणालाही सांगत नाहीत. 'परि कोणासी कळो नेदी ।' असे मौन बाळगतात. पण, संत आपली प्रचीती, अनुभूती सर्वांना अभंग, पदे, श्लोक याद्वारे सांगतात; कारण संतांना समाजाचाही उद्धार करावयाचा असतो. किंबहुना संतांच्या दृष्टीने समाजोद्धार हाच आत्मोद्धार असतो. या सामाजिक कणव भावनेमागे 'बुडते हे जन न देखवे डोळा ।' असा समाजाविषयीचा ममत्वभाव, आपलेपणा, जीवीचा जिव्हाळा असतो. समर्थांचे समग्र वाङ्मय समाजोद्धाराच्या तळमळीचाच शब्दाविष्कार आहे.

### रामायणाचा प्रभाव

टाकळी येथे समर्थांनी १२ वर्षे वास्तव्य केले. या काळात काहींच्या मते संपूर्ण वाल्मीकी रामायण त्यांनी लिहून काढण्याचे तप केले. तर, काहींच्या मते समर्थांनी दोनच कांडे, 'सुंदरकांड' व 'युद्धकांड' प्रतिलिपी केली. सध्या आपणास धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिरात समर्थांच्या हस्ताक्षरातील श्री. शंकरराव ऊर्फ नानासाहेब देवांनी परिश्रमपूर्वक मिळवलेले व जपलेले संपूर्ण रामायण पाहावयास मिळते. या दुर्मिळ संग्रहाच्या प्राप्तीच्या वेळेची समर्थभक्त श्री. नानासाहेब देव यांची प्रतिक्रिया पहा, म्हणजे आपणास त्या दुर्मिळ संग्रहाचे महत्त्व कळेल. कै. देव म्हणतात –

''महाराष्ट्राचे केव्हढे भाग्य की, श्री समर्थांनी लिहिलेली ९१० पत्रसंख्येची वाल्मीकीय रामायणाची संपूर्ण प्रत उपलब्ध व्हावी.''

समर्थभक्त श्री. देव यांना मिळालेल्या सात कांडांपैकी आदिकांड, आरण्यकांड, किष्किंधाकांड, सुंदरकांड आणि युद्धकांड ही पाच कांडे समर्थांनी माघ, शके १५४४ ते वैशाख, शके १५४६ या सव्वा वर्षात लिहिलेली आहेत आणि हा काळ म्हणजे समर्थांच्या टाकळी येथील १२ वर्षांच्या पुरश्चरणाचा काळ होता. याचा अर्थ, टाकळी येथील तपकाळातच समर्थांनी ही पाच कांडे लिहिली होती. उर्वरित २ कांडे, उत्तरकांड व अयोध्याकांड यांचा लेखनकाळ, अनुक्रमे कार्तिक, शके १५६७ आणि शके १५७१ असा आहे. हा काळ समर्थांचा मसूर, शहापूर या भागांतील वास्तव्याचा आहे. यावरून समर्थांनी टाकळीच्या पुरश्चरण काळात वाल्मीकी रामायणाच्या पाच कांडांचे लेखन केले, हे सिद्ध होते. या रामायण प्रतिलेखनाचा समर्थांवर जो विलक्षण प्रभाव पडला तो पुढे त्यांच्या संपूर्ण जीवनकार्यावर दिसून येतो.

प्रभू रामचंद्र म्हणजे मर्यादापुरुषोत्तम. भगवद्गीतेत वर्णन केलेल्या दैवी गुणसंपदेचा मूर्तिमंत आदर्श. प्रभू रामचंद्रांचे धैर्य, वीर्य, तेजस्विता, बुद्धिवैभव, धर्मज्ञता, नीतीनिष्ठा, ज्ञानसंपन्नता, औदार्य, सत्कर्म, कुशलता, प्रजाहितनिष्ठा, सामर्थ्यशील, सत्यवचनी बाणा, कृतज्ञता या दिव्य गुणांनी समर्थांचे मन अत्यंत प्रभावित झालेले होते. मूळच्या बालसुलभ संस्कारी भक्तीला आता रामायणवाचनाने व रामनामाच्या जपाने ज्ञानोत्तर भक्तीची परिपक्वता लाभली होती. रामाविषयीचा अनन्य भाव अधिक परिणत झाला होता. श्री राम हे समर्थांचे केवळ इष्ट दैवतच नव्हे, तर श्री राम हेच त्यांचे सद्गुरु होते. वयाच्या ८व्या वर्षीच समर्थांना श्री रामाचे दर्शन होऊन अनुग्रह लाभला होता. (संदर्भ : समर्थ सेवा मंडळ प्रकाशित दासबोध २००९ पारायणप्रतमधील श्री समर्थांच्या जीवनातील ठळक घटना) हा अनुग्रह कसा होता, याचा अंदाज आपण दासबोधाच्या सद्गुरुस्तवन समासातील ओव्यांद्वारे करू शकतो. समर्थ म्हणतात –

जय जयाजि सद्गुरुराजा ।<br>
विश्वंभरा विश्वबीजा ।<br>
परमपुरुषा मोक्षध्वजा । दीनबन्धु ।।८।। ....<br>
का करिता गंगेसी मिळाली ।<br>
मिळणी होताच गंगा जाली । ... ।।१३।।<br>
... । तैसा नव्हे शिष्य वेगे ।<br>
स्वामीच होय ।। १४।।

आठव्या वर्षी लाभलेल्या अनुग्रहानंतर छोटा नारायण, नारायण न राहता त्याचक्षणी रामदास व समर्थ झालेला होता. त्याला त्याची वाट रामकृपेने स्पष्ट आकळली होती. 'आदित्ये अंधकार निवारे' असे छोट्या नारायणाचे जीवन दिव्य प्रकाशाने उजळून गेले होते. 'राम माझा जीव प्राण । काही नेणे मी रामावीण ।।' अशी त्यांची भावावस्था झालेली होती. तपाचरणाने, पुरश्चरणाने त्यांच्या या मूळच्या भावावस्थेला नवी झळाळी लाभली होती. या काळातील उपासनेचा स्वानुभवच त्यांनी पुढे दासबोधात व अन्य अभंगादी साहित्यात विशद केलेला आहे. उपासनेबद्दल समर्थ म्हणतात –

राम उपासना ऐसी । ब्रह्मांडव्यापिनी पाहा ।<br>
राम कर्ता राम भोक्ता । रामरूप वसुंधरा ।।<br>
(मानपंचक)

'उपासनेचा आश्रयो मोठा ।' म्हणत त्यांनी रामोपासनेला सर्वोच्च प्राधान्य दिले; मात्र विहित कर्माची कुठेही उपेक्षा केली नाही. उपासना, कर्म आणि ज्ञान याविषयी समर्थांचा एक श्लोक विशेष उद्बोधक आहे. तो असा –

आधी पाहिजे ते कर्म । कर्ममार्गे उपासना ।<br>
उपासका सापडे ज्ञान ।<br>
ज्ञाने मोक्षचि पाविजे ।।

उपासनेचे अनेक प्रकार आहेत. समर्थांना कोणती व कशी उपासना अपेक्षित होती, याविषयी समर्थांचे जुन्या दासबोधात स्पष्ट मार्गदर्शन सापडते. ते

म्हणतात –

नवविधाभक्ती याचकारणे ।
जे आपण स्वये रामचि होणे ।
स्वयेचि रामपणे ठाकणे ।
स्वानुभवे करोनी ।।

उपासनेमध्ये नवविधाभक्तीला ते सर्वोच्च स्थान देतात व या भक्तीयोगे स्वये राम होणे व रामासारखेच सर्व प्रसंगी धीरोदात्तपणे उभे ठाकणे समर्थांना अपेक्षित आहे.

### अनेक वेळा रामदर्शन

समर्थांना केवळ एकदाच नव्हे, तर अनेक वेळा सद्गुरु श्री रामाचा साक्षात्कार झालेला आहे, असे डॉ. म. रा. जोशी (समग्र समर्थ साहित्य : प्रस्तावना) म्हणतात. समर्थांनी लिहिलेल्या 'पंचसमासी'मध्ये 'ऐशा जी सद्गुरुरामा । अगाध तुमचा महिमा ।' असा सद्गुरु श्री रामाचा महिमा वर्णन केलेला आहे. 'दासबोध', 'आत्माराम'नंतर समर्थांची १५१ ओव्यांची 'पंचसमासी' म्हणून एक प्रमुख रचना आहे. या पंचसमासीचे वैशिष्ट्य म्हणजे, या ओव्यांतून श्री रामसाक्षात्कारानंतरची स्थिती समर्थांनी व्यक्त केलेली आहे.

वृत्ति मूळाकडे पाहे । तवं रामचि दिसताहे ।
स्तब्ध होवोनिया राहे । तवं रामचि दिसे ।।
मन मुरडलिया वाटे । तवं मार्गी राम भेटे ।
मागे पुढे प्रगटे । रामचि अवघा ।।
दाही दिशा अवलोकिता । रामचि भासे तत्त्वता ।
वदन चुकवू जाता । सन्मुख श्री राम ।।
राम जालिया सन्मुख । कल्पांती नव्हे विन्मुख।
नेत्र झांकिता अधिक । रामचि दिसे ।।
मग विसरोनि पाहिले । तवं ते रामचि जाले ।
जीव सर्वस्वे वेधले । संपूर्ण रामे ।।
रामेवीण सर्वथा कांही । अणुमात्र रिते नाही ।
दृश्य द्रष्टा दर्शन तेही । रामचि भासे ।।
रामरूपी वेधले मन । तेणे राहिला कुलाभिमान ।
पूर्व दशेचे लक्षण । पालटोनी गेले ।।
ऐसा राम प्रगटला । दृश्य पदार्थ लोपला ।
असतच नाहीसा जाला । सद्गुरु प्रतापे ।।

श्री रामदर्शनानंतर – साक्षात्कारानंतर समर्थांची स्थिती कशी झाली होती व त्यांना जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, जागृतीत, स्वप्नी, सुषुप्तीत केवळ रामच राम दिसत होता. भक्ताचे, शिष्याचे, दासाचे इष्ट देवता रूप ऐक्य कशा प्रकारे होते आणि त्याचे अस्तित्व कसे गुरुरूप होते याचे या ओव्या म्हणजे विलोभनीय दर्शन आहे. गुरु–शिष्याच्या या ऐक्यालाच अद्वयभक्ती म्हणतात, पराभक्ती म्हणतात. अशा स्थितीनंतर शिष्य, शिष्य राहत नाही. समर्थांचेही तसेच झाले, ते रामदास न राहता 'श्री रामोस्मि' (मी रामच आहे) झाले.

श्री समर्थांनी आपले सद्गुरु, आपले स्वामी प्रभू रामचंद्रांचे अनेक प्रकारे, अनेक ठिकाणी स्तवन केलेले आहे. वेगवेगळ्या ग्रंथरचनेत – स्फुटरचनेत त्यांनी रामचंद्रांचा महिमा गायलेला आहे. रामभक्तिभावाचे हे समर्थकृत विविध रंगी इंद्रधनू मोठे विलक्षण आहे. या सर्व रामस्तुतीपर रचना मुळातूनच वाचणे एक आनंददायक गोष्ट आहेच, त्याशिवाय ती एक रामोपासनासुद्धा आहे. (१) समर्थकृत ओवी शतकांतील एक शतक रामचरित्रपर आहे. (२) एकवीस समासीत रघुनाथध्यान (समास क्र. २) आणि रघुनाथचरित्र (समास क्र. १५) असे दोन समास आहेत. (३) सगुण ध्यान व निर्गुण ध्यान अशी दोन प्रकरणे (४) रामायणपर १४६२ ओव्यांची दोन कांडं.

श्री रामचंद्रांचे नाम, वर्णन, भक्ती, उपासना, चरित्र या गोष्टी समर्थांनी विशद करतानाच अनेक ठिकाणी रामसभेचेही वर्णन केलेले आहे. आपल्या सर्व साहित्यकृतीचे – रचनांचे श्रेय प्रभू रामचंद्रांच्याच चरणी अर्पण केलेले आहे. 'कास या रघुनाथाची । धरिता सुख पावलो ।' या नाशिक – पंचवटीत रचलेल्या एका पदात समर्थ म्हणतात –

१) हे ज्ञान रामकृपेने । धन्य राम उपासना ।
रामदास्य घडे ज्याला । ते सर्वत्र रामदास हो ।।

***

२) रामराजा दयासिंधु । वोळला सेवकावरी ।
रामदासी ब्रह्मज्ञान । सारासार विचारणा ।।

समर्थांनी ज्या विविध प्रकारच्या विपुल रचना केल्या त्या वेगवेगळ्या नाममुद्रेने केलेल्या आहेत. 'रामदास म्हणे', 'दास म्हणे'प्रमाणेच आपणास रामी रामदास, देवदास, राघव, निजदास, कवि अशाही नाममुद्रा आढळतात. या प्रत्येक नाममुद्रेचा निर्देश असलेल्या समर्थांच्या रचना, केवळ जागेअभावी या लेखात देता येत नाहीत. पण 'कवि' ही समर्थांची नाममुद्रा असलेली रामायणाच्या युद्धकांडातील ओवी पहा –

स्वये श्रोतयाते 'कवि' प्रार्थिताहे ।
पुढे युद्धाकांडी कथा रम्य आहे ।।

अशीच 'कवि', नाममुद्रा 'लघुरामायण' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रचनेत आढळते. समर्थशिष्य गिरिधर व आत्मारामांनीदेखील समर्थांच्या अनेक नाममुद्रांचा उल्लेख केलेला आहे. दासविश्रामधाममध्ये समर्थांच्या ३६ नाममुद्रांची नावेच दिलेली आहेत. त्यात वरील नाममुद्रांशिवाय बंदे, जिंदे, फकीर, रसिक, भक्त, गण अशा नाममुद्रांचा उल्लेख आहे.

### धर्म जागो राघवाचा

समर्थांनी प्रभू रामचंद्रांची वेगवेगळ्या विशेषणांनी वेगवेगळ्या रचनेत स्तुती, गौरव केलेला आहे. त्यातील समर्थांचे आवडते, लाडके विशेषण म्हणजे 'सूर्यवंशाचे मंडण'. पुढील दोन अभंगचरण पहा –

✻ सूर्यवंशाचे मंडण । रामदासाचे जीवन ।।
अभंग गाथा (९/३)

✻ सूर्यवंशाचे मंडण । रामदासाचे भूषण ।।
(गाथा ११/४)

संत ज्ञानदेवांनी एका अभंगात 'धर्म जागो निवृत्तीचा' असे म्हटले आहे. या चरणातील निवृत्ती हा शब्द गुरु निवृत्तीनाथवाचक आहे. त्याविषयीच्या अधिक तपशिलात न जाता आपण समर्थांकडे वळू. संत ज्ञानदेवांप्रमाणेच समर्थ रामदासांनी 'धर्म जागो राघवाचा।' अशी साद घातली. या वेगवेगळ्या शब्दावलींत वरवर भेद दिसत असला, तरी त्यांचा भाव एकच आहे आणि तो काहीसा कालसापेक्ष आहे. निवृत्तीनाथांचा आणि राघवांचा धर्म हा मूलतः भागवत धर्मच आहे. या भागवत धर्मालाच समर्थांनी 'महाराष्ट्र धर्म' म्हटले आहे. संत ज्ञानदेवांचे 'जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत।' या ओवीतील विश्वात्मक भाव आणि समर्थांच्या 'नारायण असे विश्वी । त्याची पूजा करीत जावी ।' या ओवीतील वैश्विक भाव एकच आहे.

'हे महाराष्ट्राचे खरे नाथ होय!' अशा शब्दांत न्या. रानडे यांनी ज्यांचा गौरव केला ते संत एकनाथ आणि समर्थ रामदास यांच्या कार्यातील एक समानसूत्र म्हणजे प्रभू रामचंद्र! संत एकनाथ हे संत रामदासांच्या मावशीचे पती होते असा त्यांचा नातेसंबंध सांगतात. संत एकनाथांची पत्नी गिरिजाबाई व समर्थांची आई राणूबाई या दोघी सख्ख्या मावसबहिणी होत्या. राणूबाईंचे मोठे भाऊ समर्थांचे मामा, कीर्तनकार भानजी गोसावी हे संत एकनाथांचे अनुग्रहित होते. (संदर्भ : सुनील चिंचोळकर : चिंता करितो विश्वाची) दुसरी गोष्ट म्हणजे, 'हनुमंतस्वामींची बखर'मध्ये सूर्याजीपंत आपल्या दोन्ही मुलांना (गंगाधर व नारायण) (ज्येष्ठ व समर्थ) घेऊन पैठणला संत एकनाथांच्या समाधिदर्शनास गेल्याचे बखरकार सांगतात.

समर्थांना बालपणी जांबलाच घरात संत एकनाथांचे 'भावार्थ रामायण' पहावयास मिळाले असावे आणि त्यानंतर नाशिक – टाकळी येथील १२ वर्षांच्या तपाचरणकाळात समर्थांनी जे अनेक ग्रंथ अभ्यासले त्यात संत एकनाथांचे 'भावार्थ रामायण' निश्चितच असणार. कारण, समर्थ मूलतः रामभक्त असल्याने त्यांनी वाल्मीकी रामायणासमवेतच अनेक रामायणे अभ्यासली असावीत. समर्थांच्या या प्रचंड व्यासंगाचा उल्लेख आपणास दासबोधाच्या पहिल्याच समासात 'नाना ग्रंथाच्या संमती' या ओवीतून, तसेच 'इत्यादिक नाना ग्रंथ ।' या आणखी एका ओवीतून ठळकपणे

जाणवतो.

समर्थ व संत एकनाथ यांच्यातील साम्याचा आणखी एक वाङ्मयीन दुजोरा म्हणजे – संत एकनाथांनी भावार्थ रामायणात देवबंधमुक्ती करणारा योद्धा राम शब्दांकित केलेला आहे आणि तो वाल्मीकी रामायणातील रामापेक्षा वेगळा आहे. समर्थांनीही आपल्या रामायणात सीतामुक्तीऐवजी रावणाच्या कैदेतील देवांची बन्धमुक्ती करणारा रामच रंगविलेला आहे. देवबंधमुक्ती ही संकल्पना संत एकनाथांची, ती समर्थांनी अधिक ठळकपणे पुरस्कारली. यासंदर्भात काही संशोधक – अभ्यासकांची मते पहा –

डॉ. रा. चिं. ढेरे म्हणतात – ''संत एकनाथांची भावार्थ रामायणातील रामचरित्रामागची भूमिका, समर्थांनी पुरस्कारलेली होती. देवांच्या बेड्या तोडणारा आणि रामराज्याची गुढी उभारणारा संत एकनाथांचा 'राम'च समर्थांच्या हृदयात ठाण मांडून राहिला होता.''(संदर्भ : विविधा)

आणखी एक थोर चिंतक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात – ''समर्थांच्या आई राणूबाई यांच्या माहेरी संत एकनाथांचा भक्तिसंप्रदाय होता. त्याचा प्रभाव लहान नारायणावर पडून घरचा रामोपासनेचा ठसा अधिक दृढ बनला... एकनाथपरंपरेशी असे नाते जुळले. त्यामुळे पुढे रामदास हे एकनाथांचेच अवतार होत, असे संप्रदायात म्हटले जाऊ लागले.'' (संदर्भ : महाराष्ट्र धर्माचे प्रणेते ) डॉ. वसंत स. जोशी यांनीही 'समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड सुवर्ण महोत्सव विशेषांकातील लेखात (पान क्र. २१० ते २१६) अशाच आशयाचा विचार मांडलेला आहे.

महाराष्ट्रात बहुसंख्य अभ्यासक–संशोधकांचे वरीलप्रमाणे एकनाथ–रामदाससमन्वयी मत साधार असले, तरी इतिहासाचार्य वि. का. राजवाडे आणि महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे यांनी रामदासांचा रामदासी संप्रदाय इतर प्रचलित सर्व संप्रदायांपेक्षा, प्रामुख्याने वारकरी संप्रदायापेक्षा वेगळा असल्याचेच प्रतिपादन केलेले आहे. वि. ल. भावे (महाराष्ट्र सारस्वत, पान २०६) म्हणतात – ''तुलसीदास, कबीर इत्यादी साधू रामाचेच भक्त होते, पण त्यांच्या रामाचा स्वीकार रामदासांनी केला नाही. त्यांना काही कारणास्तव रामाच्या विशिष्ट स्वरूपाचा अवलंब करावासा वाटला, म्हणून रामभक्तीचे इतर पंथ विद्यमान असताही त्यांनी आपला नवीन रामदासी संप्रदाय स्थापन केला.''

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे एका लेखात म्हणतात – ''रामदासी पंथ हिंदुस्थानातल्या व महाराष्ट्रातील कोणत्याही भक्तिपंथाहून भिन्न आहे.'' एवढेच नव्हे, तर राजवाडे पुढे म्हणतात – ''प्रकाश, आनंद, स्वरूप आणि चैतन्य ह्या चार संप्रदायांहून निराळा असा रामभक्तीचा पंथ रामदासांनी काढला.'' असे अभ्यासकांचे बोटावर मोजण्याएवढे अपवाद वगळले, तर बहुतेक अभ्यासक–संशोधक वारकरी भागवत धर्म व संत रामदासांचा महाराष्ट्र धर्म वरवरचे काही फरक सोडता अंतरंगाने एकच मानतात. वि. का. राजवाडे यांचे वारकरी संतांना टाळकुटे म्हणणारे विधान, पुढे त्यांनी स्वतःच मागे घेऊन वारकरी संतांच्या कार्याचा गौरव करणारे मत प्रदर्शित केलेले आहे. दुसरी गोष्ट, राजवाडे यांच्या विधानाला समर्थ रामदासांचीच एक रचना पूर्ण छेद देणारी आहे. समर्थांची 'म्हणोनि आम्ही रामदास । रामचरणी विश्वास ।' ही 'सगुण ध्यान' रचना सर्वत्र प्रसिद्ध आहे. त्यामध्ये ''स्वरूप संप्रदाय अयोध्यामठ ।'' असा स्वरूप संप्रदायाचा सुस्पष्ट उल्लेख आहे... आणि तरीही राजवाडे म्हणतात की – ''रामदासांचा रामभक्तीपंथ प्रकाश, आनंद, स्वरूप आणि चैतन्य ह्या संप्रदायांपेक्षा निराळा आहे.'' यावरून श्री राजवाडे – भावे यांची मते एकांगी असल्याचे वा अपुऱ्या साधनांवर आधारित असल्याचेच निष्पन्न होते.

### रामकथेचा राष्ट्रीय दृष्टिकोन

रामकथेचा उलगडा समर्थ रामदासांनी राष्ट्रीय दृष्टिकोनातून केलेला आहे व तसाच तो संत एकनाथांनी केलेला होता. अनेक वर्षांच्या परधर्मियांच्या जुलमी राजवटीखाली पिचलेल्या ऐतद्देशीय प्रजेच्या मनात स्वधर्माबद्दल स्वाभिमान जागृत करण्याचा, म्हणजेच

राष्ट्रीय दृढभावाचा वन्ही चेतवण्याचा कर्मयज्ञ समर्थ रामदासांना मांडावयाचा होता व त्यासाठी दुष्टांचा संहार करून, सज्ज्नांच्या रक्षणाद्वारे धर्मचेतना जागविणारी सशस्त्र देवता समर्थांना हवी होती आणि कोदंडधारी रामचंद्र त्यासाठी अत्यंत सार्थ ठरणारी देवता होती. देवद्रोही नीतीभ्रष्ट रावणाचा संहार करून स्वधर्माची गुढी उभी करणारे प्रभू रामचंद्र हे 'देवबन्धविमोचक' होते. प्रभू रामाने सर्वसामान्य वानरांना साथीला घेऊन बलाढ्य क्रूरकर्मा रावणाचा पराभव करून, केवळ सीतामातेचीच सुटका केली असे नसून, रावणाच्या बंदीशाळेत बंदी असलेल्या शेकडो देवांची मुक्तता केलेली आहे. त्यामुळेच एकनाथांप्रमाणे रामदासांनी 'देवबन्धमोचक' म्हणून रामचंद्रांवर स्तुतिसुमने उधळीत त्यांच्या पराक्रमाचे पोवाडे गायले आहेत.

रावणाने सर्व देवांना बंदीवासात टाकले होते व त्यांची अवस्था सांगकाम्या घरगड्यासारखी करून टाकली होती. त्याचे वर्णन नाथांच्या व समर्थांच्या वाङ्‌मयात आढळते. नाथ म्हणतात –

इंद्र वारी चंद्र छत्रधारी । यम पाणी वाहे घरी ।
वायु सर्वदा पूजे वोसटी ।
विधी तेथे करी दळणकांडा ।
नवग्रहाची पीडा गाढी ।
ते रावणे घातले बांधवडी ।

एवढेच नव्हे, तर गणपती रावणाच्या बंदीवासात गाढवाचे कळप सांभाळतोय, प्रजापतीला निरोप्याचे काम दिलेले आहे. समर्थ रामदासस्वामींनी लघुरामायणात नेमके असेच वर्णन केलेले आहे.

गणेश, गाढवे वळी ।
परोपरी विटंबना । वदेल कोण रावणा ।
उदंड देव पीडिले । मदे पदासि खंडलो ।।

अशा रावणाच्या पीडाकारक बंदीवासातून सर्व देवांची सुटका रामाच्या पराक्रमाने झाली. अशा 'परित्राणाय साधुनाम । विनाशाय च दुष्कृताम्।' बाणा असलेल्या कोदंडधारी रामाचे समर्थांनी ठिकठिकाणी चेतनादायी – स्फूर्तिदायी शब्दचित्र उभे केले व समाजात स्वधर्माविषयी, स्वदेशाविषयी स्वत्वाची भावना जागृत केली.

✻ राम धर्माचे रक्षण । संरक्षण दासाचे ।।
✻ रामे ताटिका वधिली । राम सीता उद्धरली ।।
✻ रामे पाषाण तारिले । रामे दैत्य संहारिले ।
रामे बंद सोडविले । आनंदले सुखर ।।२।।
✻ रामे रक्षिले भक्तासी । रामे सोडविले देवासी ।...

प्रभू रामाने आपल्या पराक्रमाने महाशक्तीशाली उन्मत्त रावणाच्या ताब्यातून सर्व देवांची सुटका केली, सीतामातेची सुटका केली, धर्माचे रक्षण केले, भक्तीचे व दासांचे रक्षण केले. रामाच्या नावाने पाषाण तरले, असे सांगून समर्थांनी आत्मविस्मृत निद्रिस्त–निस्तेज समाजात नवतेजाचे जागरण केले. आपणास राम या प्राप्त संकटकाळातून सोडवू शकतो, फक्त आपणही प्रयत्न केले पाहिजेत. प्रभू रामचंद्रांचे वर्णन करताना अनेक ठिकाणी समर्थांनी 'पायी ब्रीदाचा तोडर' असे करून रामरायाचे ब्रीदच आहे की दुर्जनांचा संहार, भक्तांचे रक्षण। याची पुन्हा आठवण करून दिलेली आहे.

✻ यत्न तो देव जाणावा । अंतरी धरिता बरे ।
✻ केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।
✻ सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।

अशा सुभाषितवजा उपदेशाचा समर्थांनी पुन्हा पुन्हा वर्षाव केला व अखेर त्यांच्या या प्रयत्नांना रामकृपेने स्वराज्यप्राप्तीचे फळ लाभले. स्वराज्याचे जे स्वप्न त्यांनी पाहिले ते सत्यात उतरलेले पाहण्याचे भाग्य समर्थांना लाभले. हे रामकृपेचेच वरदान नव्हे काय?




# सुगम साईमाहात्म्य

सौ. शैलजा राजीव रोहोम
कोपरगांव

**साईभक्तीच्या, साईउपासनेच्या, साईध्यानाच्या व साईचिंतनाच्या प्रेरणेतून अनेक भक्तांना बाबांच्या लीला लेखन करण्याची स्फूर्ती होते. खरं तर, बाबाच आपले चरित्र भक्तांच्या माध्यमातून लिहून घेऊन आपली सेवा करुन घेत असतात. साईभक्त हेमाडपंत, संतकवी दासगणू, उपासनी महाराज, माधवराव अडकर अशा थोर भक्तांनी जे लेखन केले ती साईंचीच अक्षयकृपा आहे. अलीकडच्या काळातही रोज नव्या नव्या भक्तांना अशी साईप्रेरणा होत असते व ते बाबांच्या लीला आपल्या क्षमतेनुसार लिहून बाबांच्या चरणी अर्पण करतात. अशाच एका साईभक्ताने लिहिलेले सुगम साईमाहात्म्य...**

प्रथम वंदूनी गजानना, गौरीपुत्रा गजवदना । वागेश्वरी वाग्देवता, सरस्वती पूजियेली ।।

तन, मन, धन वाहून, वंदिले सद्गुरुचरण । वेदशास्त्र–पुराण अवघे, प्राप्त सद्गुरुचरणांसी ।।
साईचरणांचे दर्शन, जैसे पवित्र गंगास्नान । चरण वंदिता प्राप्त होई, पुण्य तिन्ही लोकांचे ।।
संत बघूनी जात्यावरी, चकित जाहले मनोमनी । सरसावली मग लेखणी, चरित्र लिहिण्या बाबांचे ।।
देवगिरीचे राजे यादव, अवघ्या महाराष्ट्राचे भूषण। हेमाद्रीपंत विद्वान, शास्त्रपंडित, मंत्रीगण होते तयांचे ।।
गुरुची गरज काय जीवनी, दाभोलकर घालती वादावादी । म्हणून हेमाडपंत ही उपाधी, बाबा देती दाभोलकरां ।।
अवघ्या भक्तांची पापं, नष्ट करती आपोआप । खाली कर्म अन् वर भक्ती, दोन पाळी जात्याची ।।
ज्ञानाचा तो खुंटा भक्कम, फिरता जाते गरगर । लोभ, मोह, अहंकार, दळून पीठ होतसे ।।
पाहून बाबांची अगाध लीला, महामारीचा जो प्रबंध झाला । मग अंतरीच्या भावभावना, लिहिते झाले हेमाडपंत ।।

***

श्री साईंच्या अगाध लीला, मार्ग दाखविती भक्ताला । भवसागर पार करण्याला, दिशादर्शक होतील ।।
असता बाबांची कृपादृष्टी, मग बाबाच देती स्फूर्ती । बाबाच करवतील कृती, योग्य भक्ताचे हाताने ।।
साईबाबांची उक्ती, कृती, श्रवण करीता ठेवून भक्ती । येईल आपोआप अनुभूती, मना विश्रांती लाभेल ।।
बाबांच्या जे कथा ऐकती, भवसागर ते तरूनी जाती । म्हणून चरित्र लिहिण्या दिली संमती, दाभोलकरां बाबांनी ।।
मनोभावे ऐकता कथा, न उरे मनी काही चिंता । दूर होतील साऱ्या व्यथा, केवळ कथा श्रवणाने ।।
जे जे घेतील साईनाम, सदैव साईंत जे रममाण । केवळ सदैव साईस्मरण, सदा सुखी होतील ते ।।

***

बाबांचे संपूर्ण सत्य चरित्रलेखन, होते जरी कार्य कठीण । बाबांनीच घेतले लिहवून, हेमाडपंतांच्या हाताने ।।
धन्य धन्य साईकथा, अहंकार आणि व्यथा । दैन्य, दु:ख आणि चिंता, श्रवण करीता जाती लया ।।
कैसे करावे आचरण, मनुष्यधर्माचे पालन । अगदी सहज सोपे करून, बाबा सांगती संवादे ।।
भक्तिभावे ऐकता, वाचता, साईध्यान लागे चित्ता । हृदयी साई विराजमान होता, मन:शांती मिळेल।।
अधर्मी, अविचारी, चरित्रहीन, मार्ग क्रमावा यांना टाळून । भक्तिभावाने सेवा करून, आपुले कल्याण साधावे ।।
साईचरणी शरण जाता, अहंभाव जातो विलया । नित्य, सत्य, अविनाशी, ज्ञान, आनंद प्राप्त होय ।।
आनंदघन, चैतन्यघन, निर्मोही, निरपेक्ष मन । 'अल्ला मालिक' केवळ चिंतन, सद्गुरु साईरूप दिसे।।
सद्गुरूंचे सदैव चिंतन,'मी'पणाचे चरणी समर्पण । गुरुविना न मनी अन्य, एकरूप नाते गुरु-शिष्य ।।
कसे दैनंदिन प्रसंगातून, बाबा देती सहज शिकवण । कसे बाबांच्या वचनांतून, भक्तजन बोध घेती ।।
कथा एका रोहिल्याची, भर मध्यरात्री वेळ झोपेची । सवय तारस्वर कलमे पढण्याची, लोक अती त्रासले ।।
रोहिल्याची पाठराखण, बाबा करीती आनंदून । उलट त्याच्या नामगजरी, बाबा तल्लीन होती अती ।।
ज्या ठिकाणी भजन-पूजन, भगवंताचे नामस्मरण । त्या ठिकाणी रात्रंदिन, भगवंत वास करीतसे ।।
अनादि, अनंत, सर्वव्यापी, निर्मिली चराचर सृष्टी । भक्ताच्या हर एक कृती, साक्षीदार असती बाबा ।।
साईचरित्र अति पावन, श्रवणे पवित्र अंत:करण । भवतापाचे होई हरण, प्रेमे श्रवण केल्याने ।।
हिरे, माणके धनाचा ठेवा, काळजीने जसा जपावा । तसा साईनामाचा ठेवा, जपून ठेवा हदयात ।।
वाढतो अधर्म आणि अनीती, वाढते अति स्वार्थवृत्ती । तेंव्हा धर्मजागृती करण्यासाठी, संत अवतार घेतात ।।
दुष्ट प्रवृत्तींचा करण्या संहार, दीनदुबळ्यांचा करण्या उद्धार । केवळ परमार्थ करण्यासाठी, संत अवतार घेतात ।।
संतकृपेची अनुभूती, कशी वर्णावी चालेना मती । वसता भक्तांच्या अंतर्यामी, आनंदी-आनंद सर्वत्र ।।
श्री रामांच्या पदस्पर्शाने, पावन सारे गोदातीर । संत-महंतांचे वास्तव्याने, जागोजागी तीर्थक्षेत्र ।।
गोदावरीचे दक्षिणतीरी पावन झाली शिरडी नगरी । श्री साईंच्या आशीवार्दाने, तीर्थक्षेत्र जाहले ।।
भवसागर करूनी पार, अवघे विश्व हा संसार । निर्मोही, निर्लेप, उदार; अल्ला मालिक जप सदा ।।

***

इहलोकी नाही आसक्ती, कर्णापरी उदार वृत्ती । काय वर्णावी ती स्थिती, आत्मरंगी रंगलेली ।।
उच्च-नीच, रंक-राव, न केला कधी भेदभाव । मनी सदा शुद्ध भाव, अमृतवाणी मुखी सदा ।।
सकल जन्मांची पुण्याई, म्हणून भक्तां भेटले साई । प्रत्यक्ष साईंचा सहवास, पुण्यवंतां लाभला ।।
साईच कृष्ण, साईच राम, साईच भक्तां चारी धाम । सकल तीर्थांचा होतसे संगम, साईंच्या पवित्र चरणांशी।।
जैसी ज्याची श्रध्दा-भक्ती, आपापल्या इष्ट देवतेवरती । तैसी तैसी त्यांना प्रचीती, बाबा देती शिरडीत ।।
श्री कृष्णाची द्वारकानगरी, की पांडुरंगाची पंढरी । अवघी तीर्थे सामावली, श्री क्षेत्र शिरडीत ।।
दासगणूंची इच्छा प्रबळ, प्रयागी साधावा पर्वकाळ । दासगणूंसाठी गंगा-यमुना जल, पाझरे साईचरणांतूनी ।।
साई हिंदू की यवन, कशासाठी वृथा चर्चा गहन । नष्ट करण्या भेदाभेद, संत अवतार घेतात ।।
कोठून आले, कुठली जाती, व्यर्थ साऱ्या उचापती । शुध्द ठेवूनी आपली मती, कृपाप्रसाद घ्यावा सुखे ।।
रामभक्ता रामदर्शन, दत्तभक्ता दत्तदर्शन । आपापल्या उपास्य देवतेचे, दर्शन भक्तां घडतसे ।।
गुरुस्थानी लिंबाखाली, बालपणी तपश्चर्या केली । त्या लिंबतरुचा प्रेमाने, आदर करीती श्री साई ।।

***

अहोभाग्य या शिरडीचे, म्हणोनी बाबा परतून आले । शिरडीचे हे भाग्यच आले, चांदपाटलाचे वऱ्हाडात ।।
धूपखेडयाचे चांदपाटील होते, हरवल्या घोडीचे शोधात । निराश होऊन परत फिरता, अचानक दृष्टीपथा फकीर आले ।।
हरवली घोडी सापडली, फकिराची कृपा झाली । निघे जळत्या निखाऱ्यासह पाणी, चिमटा खुपसता जमिनीत ।।
पंचमहाभूतांवरील सत्तेची, चांदपाटलाला आली प्रचीती । गुंग झाली पाटलाची मती, फकिरा घेऊन आले घरा ।।
पाटलाघरी कार्य निघाले, शिरडीत सोयरे–संबंध झाले । लग्नासाठी फकिरासह आले, वऱ्हाड सारे शिरडीला ।।
खंडोबाच्या देवळापाशी, सारे वऱ्हाड उतरले मुक्कामासी । 'या साई' म्हणोनी बालफकिराचे, स्वागत करीती म्हाळसापती ।।
साईंच्या आधी बारा वर्षे शिरडीत, देविदास वास्तव्यास । देविदासांच्या सहवासात, बाबा रमले शिरडीत ।।
संत गंगागीर, संत आनंदनाथ, बालसाईंची करीती पारख । म्हणती साईरूपी रत्न लाभले, परमपुण्याईने शिरडीस ।।
बाबांचा नित्यनियम, कच्चे घडे आणून, विहिरीवर घेती भरून । कच्च्या घड्यातून पाणी वाहून, फुलबाग फुलविती बाबासाई ।।
सायंकाळी निंबाखाली, घडे आणूनी ठेवताक्षणी । ठेवण्याचा केवळ अवकाश, आपोआप फुटती घडे ।।
तरुणपणातील साईंचा, पेहराव होता पहिलवानाचा । मोहिद्दीनशी कुस्तीनंतर, पेहराव बदलती श्री साई ।।
अंगी कफनी पायघोळ, डोई बांधती वस्त्र धवल । चिलीम, सटका, टमरेल, सदैव जवळ बाळगती ।।
वास्तव्य पडक्या मशिदीत, अंथराया एक तरट । कमरेला एक लंगोट, पायही असती अनवाणी ।।
मशीद अवघी दोन खणी, अखंड पेटलेली धुनी । केवळ तरटावर बसूनी, 'अल्ला मालिक' सदा मुखी ।।
आरंभी श्री बाबासाई, पणत्यांनी उजळिती मशीदमाई । दिव्यांची करीती रोषणाई, भिक्षा मागून तेलाची ।।
वाण्यांच्या मनी आले कपट, सर्वांनी मिळूनी केला कट । संपवावी ही कटकट, तेल फुकट देण्याची ।।
तेल मागण्या बाबा जाता, ठरवून वाणी नाही म्हणता । माघारी वळून काही न बोलता, बाबा गेले मशिदीसी ।।
वाणी सारे गंमत बघती, कशी होते बाबांची फजिती । तेलावीण कश्या पेटतील ज्योती, रोजची कटकट टळेल ।।
टमरेलातील थोडे तेल, त्यात बाबांनी घातले जल । जल, तेल सारे केले प्राशन, ब्रह्मार्पण म्हणोनिया ।।
मग पणत्यांत ओतूनी पाणी, कोरडे काकडे भिजवूनी । मशीद गेली उजळूनी, रात्रभर दिव्यांनी पाण्याच्या ।।
एक जव्हारअली पढीक फकीर, बाबा त्याचे शिष्य थोर । गुरुआज्ञेचा ठेवूनी आदर, शिष्यधर्म पाळती ।।
जव्हारअलीचा भ्रमाचा भोपळा, देविदासाने लीलये फोडिला। फकिरा जिंकूनी घेतला, शास्त्राच्या वादविवादात।।

***

संसाराचा हा तारु, पार लाविती सद्गुरू । नेत्र लागती झरू, गुरुच्या केवळ दर्शनाने ।।
सद्गुरुचे ज्या होते दर्शन, तो भक्त एक पुण्यवान । सद्गुरुचे करता स्मरण, सकल दु:खे नष्ट होती ।।
सोडावा लौकिकी मानापमान, देवाच्या दारी मिळावा मान । अन्नवस्त्रांची नसेल वाण, कधीही साईभक्ताला ।।
अंत:करणी भक्तीचा पाझर, इंद्रिये फुटती भक्तीचे अंकुर । पडावा साऱ्या जगाचा विसर, साईचरणी चित्त जडो ।।
सदा साईंचे मनी चिंतन, मोह, माया रहित मन । संसाराचे न उरो भान, साईचरणी मन तृप्त ।।
साईकथेचे श्रवण, मनन, करावे होऊन तल्लीन । मन होईल प्रसन्न, मन:शांती प्राप्त होई ।।
सन १८९७ साली, गोपाळगुंडांनी यात्रा भरविली । निमोणकर आणि दामूअण्णांनी, निशाणे लाविली मशिदीवरी ।।
रामनवमीला केवळ उरुस यात्रा, बघूनी भिष्मांनी विचार केला । रामजन्माच्या उत्सवाला, संमती घ्यावी बाबांची ।।
राधाकृष्णाने सुंठवडा केला, मशिदीत पाळणा हलला । होऊन मग गोपाळकाला, सांगता झाली उत्सवाची ।।
१९११ पासून, रामजन्माचा आनंददायी सण । शिरडीकर करती आनंदून, अखंड तो साजरा ।।

**(साईभक्त सौ. रोहोम लिखित पोथीतील काही भाग)**

संपर्क : ९४२१८०९२५८, ९४२२२२८१५१

# शिर्डी वृत्त शिर्डी वृत्त शिर्डी वृत्त शिर्डी वृत्त



## सोन्याचे फुलपात्र श्री साईबाबांच्या चरणी अर्पण



सिकंदराबाद येथील देणगीदार साईभक्त श्री. रामेश्वरराव नारायण शर्मा यांनी ५ लाख ८४ हजार ६१० रुपये किमतीच्या १९५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे फुलपात्र श्री साईबाबांच्या चरणी अर्पण केले.

# साईभक्तांना ई-रेल्वे तिकिटाच्या आरक्षणाबरोबरच दर्शनाचे पासेसही आरक्षित करण्याच्या सुविधेचा शुभारंभ...

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने रेल्वेने प्रवास करून शिर्डी येथे श्री साईबाबांच्या समाधीच्या दर्शनाकरिता येणाऱ्या साईभक्तांना ई-रेल्वे तिकिटाच्या आरक्षणाबरोबरच दर्शनाचे पासेस आरक्षित करण्याची सुविधा, इंटरनेटद्वारे संस्थानमार्फत उपलब्ध असलेल्या विविध सुविधा व मोबाईल ॲप्लीकेशनद्वारे देण्यात येणाऱ्या विविध सुविधांचा शुभारंभ संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल व विश्वस्त श्री. भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मे. टीसीएसचे उपाध्यक्ष श्री. व्ही. राजण्णा, IRCTCचे जनरल मॅनेजर श्री. टी. पद्ममोहन, संस्थानचे उपजिल्हाधिकारी सर्वश्री धनंजय निकम व मनोज घोडे पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बाबासाहेब घोरपडे, प्रशासकीय अधिकारी डॉ. आकाश किसवे, प्रशासकीय अधिकारी श्री. अशोक औटी, माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख श्री. अनिल शिंदे, सर्व विभागांचे प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल म्हणाल्या की, संस्थानच्या वतीने रेल्वेने प्रवास करणाऱ्या साईभक्तांना ई-रेल्वे तिकिटाचे आरक्षण करण्याच्या वेळेसच श्री साईंच्या दर्शनाचे पासेसही आरक्षित करण्याची सुविधा ई-रेल्वे तिकीट बुकिंग IRCTCच्या वेबसाइटवरून संस्थानच्या ऑनलाइन सर्व्हिसेस (online.sai.org.in) या वेबसाइटद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे साईभक्तांच्या वेळेत बचत तर होईलच, त्याचबरोबर त्यांना श्रींचे दर्शन सुलभतेने होऊन त्यांची शिर्डीवारी अधिक सुखकर होईल. सदरची सुविधा ही साईनगर-शिर्डी, कोपरगांव, नगरसुल, मनमाड व नाशिक या रेल्वेस्थानकांचे तिकीट आरक्षित करणाऱ्या साईभक्तांसाठी उपलब्ध असणार आहे. IRCTCच्या मार्फत सदरची सुविधा भाविकांना उपलब्ध करून देणारे शिरडी साईबाबा संस्थान हे देशातील प्रथम देवस्थान आहे. संस्थानच्या वेबसाइटद्वारे आरती व दर्शनाच्या पासांप्रमाणेच सत्यनारायण व अभिषेक पूजांची तिकिटे आगाऊ आरक्षित करता येणार आहेत. तसेच, मोबाईल ॲपच्या सहाय्याने साईभक्तांना त्यांच्या मोबाईलद्वारे संस्थानमार्फत उपलब्ध सत्यनारायण व अभिषेक पूजा यांची कुपन्स, दर्शन व आरत्यांचे पासेस, आगाऊ रुम बुकिंग, देणगी व प्रकाशने आदी सुविधांचा लाभ घेता येईल. यावेळी संस्थानचे विश्वस्त श्री. भाऊसाहेब वाकचौरे, IRCTCचे जनरल मॅनेजर श्री. पद्ममोहन आदींची यथोचित भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार संस्थानचे उपजिल्हाधिकारी श्री. मनोज घोडे पाटील यांनी मानले.






शिर्डी वृत्त


# प्रजासत्ताक दिनानिमित्त संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण


श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने दिनांक २६ जानेवारी २०१९ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थानचे विश्वस्त श्री. भाऊसाहेब वाक्‌चौरे, उपजिल्हाधिकारी सर्वश्री धनंजय निकम व मनोज घोडे पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बाबासाहेब घोरपडे, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. आनंद भोईटे, पोलीस उपनिरीक्षक श्री. मधुकर गंगावणे, सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, तसेच शैक्षणिक संकुलातील शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



# क्रीडाप्रशिक्षक प्रा. राजेंद्र कोहकडे यांचा सत्कार

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या श्री साईबाबा शैक्षणिक संकुलातील क्रीडाप्रशिक्षक प्रा. राजेंद्र कोहकडे यांची पुणे येथील छत्रपती स्टेडियम बालेवाडी येथे आयोजित 'खेलो इंडिया' या राष्ट्रीय क्रीडास्पर्धांकरिता व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडियाकडून तांत्रिक अधिकारी या पदावर निवड झाल्याबद्दल दिनांक २६ जानेवारी २०१९ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त त्यांचा संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल व विश्वस्त श्री. भाऊसाहेब वाक्‌चौरे  यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थानचे उपजिल्हाधिकारी सर्वश्री धनंजय निकम व मनोज घोडे पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बाबासाहेब घोरपडे, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. आनंद भोईटे, पोलीस उपनिरीक्षक श्री. मधुकर गंगावणे, सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, तसेच शैक्षणिक संकुलातील शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.






# पुलवामा येथे शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांना संस्थानच्या वतीने २.५१ कोटी रुपयांचा मदतनिधी...

जम्मू व काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांवर दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यामध्ये ४४ जवान शहीद झाले. या शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांना सर्व साईभक्तांच्या व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने २.५१ कोटी रुपयांचा मदतनिधी देणार असल्याची माहिती संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे यांनी दिली.

डॉ. हावरे म्हणाले की, जम्मू व काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांवर दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यामध्ये ४४ जवान शहीद झाले आहेत. या घटनेचा सर्व स्तरांतून तीव्र संताप व निषेध व्यक्त केला जात आहे. या हल्ल्याला देशाचे सैन्य आणि शासन योग्य वेळी उत्तर देईलच. या संतापजनक व निषेधार्ह घटनेबद्दल आपल्या संवेदना सर्व देशाने व्यक्त केल्या आहेत आणि त्या संवेदनांचा आदर श्री साईबाबा संस्थान करीत आहे. त्या संवेदना व्यक्त करून या हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांना देशभरातील सर्व साईभक्तांच्या व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने २.५१ कोटी रुपयांचा निधी देण्यासंदर्भात मी संस्थानच्या सर्व विश्वस्तांशी चर्चा केली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयास व शासनाच्या परवानगीस अधीन राहून सदरचा निधी देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

# साईबाबा संस्थानला कर्मचारी शिवाजी जाधव यांची ५ लाख रुपयांची देणगी



श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कर्मचारी श्री. शिवाजी पांडुरंग जाधव यांनी संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयाकरिता उपकरणे खरेदी करण्याकामी ५ लाख रुपयांची देणगी दिली असून, सदर देणगी रकमेचा धनादेश त्यांनी संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे यांच्याकडे सुपूर्द केला.

यावेळी सौ. नलिनी हावरे, शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे माजी नगराध्यक्ष श्री. शिवाजी गोंदकर, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी सोसायटीचे अध्यक्ष श्री. तुषार शेळके व श्री. जाधव यांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

याप्रसंगी देणगीदार कर्मचारी श्री. शिवाजी पांडुरंग जाधव व त्यांच्या कुटुंबीयांचा संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# साईभक्तांना मुंबई ते शिर्डी लवकरच स्वतंत्र पालखीमार्ग मिळणार!

मुंबईहून शिर्डीला दिंडी घेऊन येणाऱ्या लाखो साईभक्तांच्या सोयीकरिता स्वतंत्र पालखीमार्गाचा विकास आराखडा तात्काळ तयार करण्याचे निर्देश व तातडीने काम सुरू करण्याचे आश्वासन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले असल्याची माहिती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे यांनी दिली.

डॉ. हावरे म्हणाले की, जगभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या श्रीक्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी लाखो साईभक्त दररोज येत असतात. यामध्ये मुंबई येथून शिर्डीला येणाऱ्या पालख्या आणि पदयात्री यांची संख्या साडेचार लाखांवर आहे. त्यातही तरुण साईभक्तांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. तसेच, मोठ्या संख्येने महिलाही या पालख्यांमध्ये सहभागी असतात. हे सर्व साईभक्त मुंबई–आग्रामार्गे आणि घोटी–शिर्डीमार्गे पालखी घेऊन येत असतात. त्यामुळे या मार्गावरून चालणे जिकिरीचे व धोकादायक होते. महामार्गावरील भरधाव वाहतुकीमुळे होणाऱ्या अपघातांमध्ये अनेक साईभक्तांना आपला जीव गमवावा लागला आहे. अलीकडेच झालेल्या सिन्नरजवळील देवपूर गावाजवळील अपघातात मुंबईतील ५ साईभक्त दक्षावले, तर २१हून अधिक भक्त जखमी झाले. त्यामुळे अनेक साईभक्तांकडून स्वतंत्र पालखीमार्गाची मागणी सातत्याने होत आहे.

त्यानुसार श्री साईबाबा संस्थान साईभक्तांच्या गरजांवर लक्ष केंद्रित करीत असून, पालखीमार्गाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांची भेट घेऊन मुंबईपासून शिर्डीपर्यंत रस्त्याच्या कडेने चालण्यासाठी एक स्वतंत्र पालखीमार्ग तयार करण्याबाबत विनंती पत्र देण्यात आले होते. त्यानुसार राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री



श्री. चंद्रकांतदादा पाटील यांनी या मागणीची तात्काळ दखल घेत तातडीने शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी याच्यासमवेत बैठक घेऊन स्वतंत्र पालखीमार्ग तयार करण्यासाठी विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेले असून, सदरचे काम तातडीने सुरू करण्यात येणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

या प्रस्तावित पालखीमार्गावर उन्हापासून संरक्षणासाठी वृक्षारोपण, मार्गालगत प्रत्येक १५ कि.मी. अंतरावर एक निवारा शेड (स्वच्छता व निवासाच्या सोयींनी युक्त) अशा विविध सोयी–सुविधा उपलब्ध करण्यासाठी संस्थानच्या वतीने योग्य ते सहकार्य करण्यात येणार आहे. हा पालखीमार्ग २५० कि.मी. लांबीचा असून, तो मुंबईहून शिर्डीला येणाऱ्या रस्त्याच्या उजव्या बाजूला राहणार आहे. हा मार्ग १५ फूट रुंदीचा व तो रस्त्यापेक्षा १ फूट उंचीवर असणार आहे, जेणेकरून त्यावर वाहने चढू शकणार नाहीत. या पालखीमार्गामुळे मुंबईहून शिर्डीला येणाऱ्या साईभक्तांची पदयात्रा सुलभ व आनंददायी होणार असल्याचे सांगून, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील व महाराष्ट्र शासन यांनी हा प्रश्न तातडीने सोडविण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून श्री साईबाबा संस्थान व साईभक्तांच्या वतीने डॉ. हावरे यांनी त्यांचे आभार मानले.



रामनवमी उत्सवात श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेताना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे व सौ. नलिनी हावरे; सोबत संस्थानचे विश्वस्त ॲड. मोहन जयकर...



श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दीपक मधुकर मुगळीकर (भा.प्र.से.) यांनी सपत्नीक श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला.

मार्च-एप्रिल २०१९ साईलीला RNI Regd. No. : MAH/MAR/2001/10353

## ब्रिटिश काळातील इ.स. १८३९ सालातील एक प्रभू रामचंद्रांचे नाणे




## आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंग यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतल्यावर जलविषयक मार्गदर्शन केले ...



प्रकाशक व मुद्रक मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता हे द्वैमासिक मधुरा प्रिंट सोल्युशन्स, बी-२४, अंबड एम.आय.डी.सी., नाशिक - १० येथे छापून साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०००१४ येथे प्रकाशित केले.

* संपादक : मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

* कार्यकारी संपादक : विद्याधर ताठे ९८८१९०९७७५